
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

# हाकारा

जानेवारी - मार्च २००९



## 'जव्हार' चे आदिवासी जीवन व संस्कृती

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस - मास)

मानव विज्ञान या संज्ञेमध्ये मानव, समाज, संस्कृती व पर्यावरणाशी असलेले नाते याविषयी सर्वांगीण दृष्टीने अभ्यास करणाऱ्या सर्व विद्याशाखांचा अंतर्भाव होतो. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना १९७६ साली पुणे विद्यापीठात झाली. शासन, सामाजिक कार्यकर्तेव संशोधक यांना एका व्यासपीठावर आणून आदिवासी ग्रामीण तसेच शहरी समाजातील लोकांच्या समस्या समजावून त्या सोडविण्यासाठी ज्ञान व अनुभवाचा उपयोग करणे हे परिषदेचे मुख्य ध्येय आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले आदिवासी सचिव - आयुक्त श्री. वसंत मंडलेकर हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. त्यानंतर प्रा. गं. बा. सरदार, श्री जनार्दन वळवी, प्रा. पां. अ. सुखात्मे, प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी अध्यक्षपद भूषविले. आदिवासी भागात काम करणारे कार्यकर्तेतसेच आदिवासी साहित्यिक यांना महाराष्ट्रात प्रथमच परिषदेचे एका व्यासपिठावर आणले.

केवळ आदिवासींच्या प्रश्नांना वाहिलेले हाकारा त्रैमासिक गेली २५ वर्षेपरिषदेतर्फे प्रकाशित होत आहे. लोकांच्या समस्या त्यांच्या नजरेतून समजून, त्यांचा सहभागातून एकात्मिक विकास साधण्याची परिषदेची वैचारिक बैठक आहे. आर्थिक विकास व समता हे परिषदेचे ब्रीद आहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमाद्वारे आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आदिवासी लोकांचे सबलीकरण करणे व त्या प्रक्रियेतून त्यांचा आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता जागृत करणे हा परिषदेचा दृष्टिकोन आहे. त्याद्वारे बहुविध राष्ट्रीय सांस्कृतिक प्रवाहास आदिवासी संस्कृतिच्या योगदानाच्या निरंतर संधी प्राप्त होतील.

यापुढील काळामध्ये आर्थिक परिवर्तनाद्वारे सामाजिक क्षेत्रांचा विकास घडवून आणणाऱ्या सरकारी व स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने वाटचाल करण्याचा परिषदेचा मानस आहे. परिषदेची कार्यकक्षा अधिक विस्तृत व्हावी या हेतूने दोन केंद्रांची स्थापना केली आहे.

१. स्वास्थ व विकास संशोधन केंद्र

२. आदिवासी व ग्रामीण विकास केंद्र

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व**

हाकारा वार्षिक सभासद १०० रुपये (व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद १५० रुपये (संस्थासाठी)

परिषद आजीव सभासद १००० रुपये (व्यक्तींसाठी)

परिषदेच्या आजीव सभासदांना हाकारा विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक / आजीव वर्गणी कृपया खालील पत्त्यावर महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड डाफ्ट अथवा मनिऑर्डर पाठवावी. मनिऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.

आपल्या क्रियाशील सहकार्याबद्दल धन्यवाद

कष्टकरी जनता, भूषण भारता। वंदन करितो पददलिता ॥

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

# हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

वर्ष : ३० वे | जानेवारी-मार्च २००९ | अंक : पहिला

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | २ |
| जव्हार ऐतिहासिक आदिवासी संस्थान | ४ |
| जव्हारचे सुपुत्र - प्रा. गं. बा. सरदार | ५ |
| होळी - कै. ग. ये. मुकणे (गुरुजी) | ९ |
| जव्हार तालुक्यातील जगदंबेचा उत्सव बोहाडा - (कै. ग. ये.मुकणे, गुरुजी) | १३ |
| देऊ बाबा - कै. ग. ये. मुकणे (गुरुजी) | २१ |
| गंगूचा खवीस मैतर - भावेश लक्ष्मण भोय | २५ |
| देव करतो ते आपल्या बऱ्यासाठी ! - कै. ग. ये.मुकणे (गुरुजी) | ३३ |
| आदिवासींनी आत्मपरीक्षण करणे काळाची गरज! - रवि लक्ष्मण बुधर | ३५ |
| संस्थावृत्त - १९७६ साली जव्हार येथील शिबिराचा वृत्तांत | ३८ |



- **पत्रव्यवहाराचा पत्ता**
  महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
  ६४, आनंद पार्क, औंध,
  पुणे - ४११ ००७.
  टेलिफॅक्स (०२०)२५८९७२९८

**अंक मूल्य ३०/- रूपये**

- **अक्षर जुळणी**
  नंदू हि. दिघे
- **मुद्रण स्थळ**
  असाईन सिस्टिम्, पुणे
- **मुद्रक व प्रकाशक**
  रा. के. मुटाटकर
  अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
- **मुखपृष्ठ छायाचित्र**
  जव्हार मधील तारपा
  वाजविणारा आदिवासी


या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

जव्हार, ठाणे जिल्ह्यातील एक ऐतिहासिक आदिवासी संस्थान. आजचा जव्हारचा काही भाग पूर्वीच्या मोखाडा तालुक्यात होता; परंतु जव्हार संस्थानची 'जव्हार' ही राजधानी असल्यामुळे व हे एक थंड हवेचे ठिकाण म्हणून याला १९६१ च्या पुनर्रचनेनंतर तालुक्याचा दर्जा मिळाला. आज महाराष्ट्रात हे एक पर्यटन स्थळ म्हणून विकसित होत आहे.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे माजी अध्यक्ष व प्रसिध्द विचारवंत, साहित्यिक प्रा. गं. बा. सरदार हे मूळचे जव्हारचेच. १९७६ साली महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना झाली, आणि त्याचवर्षी ठाणे जिल्ह्यातील जव्हार येथे पुणे विद्यापीठाचा मानवशास्त्र विभाग व मुंबईच्या भारतीय सामाजिक अनुसंधान परिषद यांच्या सौजन्याने जव्हार येथे ३ दिवसांचे शिबिर 'आदिवासींच्या शैक्षणिक व इतर समस्या' या विषयावर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरासाठी पुणे विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरु प्रा. देवदत्त दाभोळकर व प्रा. सरदार यांना बोलावले होते. सरदार दाभोळकरांबरोबर येणार होते. परंतु काही कारणास्तव दाभोळकरांनी येत नसल्याचे कळविले. यामुळे सरदारही येणार नाहीत असेच आम्ही गृहीत धरले. परंतु आश्चर्य असे की, सरदार आपली प्रकृती ठीक नसतानाही एस. टीने जव्हारला आले व शिबीराला उपस्थित राहिले. नंतर प्रा. दाभोळकरही दिल्लीहून परस्पर जव्हारला आले.

या शिबिराला पुणे विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. देवदत्त दाभोळकर, प्रा. गं. बा. सरदार, बाल शिक्षणाच्या प्रणेत्या ताराबाई वर्तक, श्री. अनंतराव पाटील आदींनी बहुमोल मार्गदर्शन केले. परिसंवाराचे उद्घाटन त्यावेळचे जव्हारचे राजे श्रीमंत यशवंतराव मुकणे यांनी केले. या शिबिराचा सविस्तर वृत्तांत या अंकात दिलेला आहे. त्याचबरोबर जव्हार तालुक्यातील ५ गावांची अभ्यास पाहणी करण्यात आली होती. त्यातील निष्कर्ष देखील अंकात दिलेले आहेत.

जव्हार संस्थानचे राजगुरु कै. ग. ये. मुकणे (गुरुजी) यांनी येथील आदिवासी जीवन, संस्कृती व समस्यांचा अतिशय जवळून अनुभव घेतलेला होता. त्यांनी अनुभवलेले आदिवासींचे सांस्कृतिक जीवन त्यांच्याच शब्दात त्यांनी लिहून ठेवले होते. त्यातील काही लेख या अंकात समाविष्ट आहेत.

जव्हार-मोखाडा या आदिवासी भागात होळी, बोहाडा, तारपा अशी विविध नृत्ये विविध सण-उत्सवांच्या निमित्ताने होत असतात. आदिवासी नृत्य हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे. निरनिराळे धार्मिक विधी, सामाजिक समारभ, पिकांच्या कापणीचा हंगाम अशा निरनिराळ्या प्रसंगी नृत्ये सादर केली जातात. जव्हार भागात कोकणा, वारली, ढोरकोळी, महादेव कोळी, ठाकर, कातकरी इत्यादी आदिवासी जमाती राहतात. प्रत्येक जमातीत वैशिष्ट्य पूर्ण अशी नृत्ये व प्रसंगानुसार खास गाणी गायिली जातात.

ठाणे, नाशिक जिल्ह्यातील या आदिवासींमध्ये 'बोहाडा' नावाचे नाट्यनृत्य प्रचलित आहे. त्यात दशावतारांसारखी मुखवट्याची सोंगे असतात. हे नाट्यनृत्य गावातील गावदेवीसाठी देव-देवतांना व पूर्वजांना आळवून दुष्काळ व रोगराई नष्ट करण्यासाठी करण्यात येते. गावदैवत, पौराणिक कथा या सोंगाबरोबर आदिवासींचे सामाजिक जीवन ग्रासणारे सावकार, व्यापारी, जमीनदार व पांढरपेशा वर्ग यांची सोंगे देखील यात नाचविली जातात.

अनेक जमातीत होळीच्या दिवसांपासून पाच दिवस होळीनृत्ये खेळली जातात. त्यांत अनेक नृत्ये उदा. शिकारी नृत्ये टिपऱ्या, बारवनृत्य, ढोलनाच वगैरे प्रकार सादर केले जातात. विशेषत: सातपुड्यांतील आदिवासी जमातींतमध्ये होळी सणाला अनन्य साधारण वेगळेपण आहे. जव्हारच्या होळीचे मात्र थोडे महत्व आहे. येथे आदिवासी राजाचे संस्थान असल्यामुळे येथील प्रत्येक होळीची ठिकाणे ठरलेली असतात. धाकटी होळी व मोठी होळी अशा वेगवेगळ्या होळ्या येथे पेटविल्या जात. आजही काही प्रमाणात ही परंपरा येथे टिकून आहे.

निसर्गाशी एकरुप असणाऱ्या या जमातींमध्ये आज बदलल्या परिस्थितीनुसार परिवर्तन होऊ लागले आहे. शिक्षण, आधुनिक जगाचा सहवास, विविध साधनांची उपलब्धता यामुळे आदिवासींच्या परंपरागत कला, संगीत व त्यांची नृत्ये मागे पडत आहे. अशा या सुधारणांचा स्वीकार करताना काहीसे आत्मपरीक्षणही आवश्यक आहे, अशा प्रकारचे विचार रवि बुधर यांनी मांडले आहेत.

एकंदरीत 'जव्हार' मधील आदिवासी जीवन संस्कृतीची ओळख करुन देणारा हा अंक आपणास पसंत पडेल ही अपेक्षा. आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

**प्रा. रा. के. मुटाटकर**
**ग. शां. पंडित**



# जव्हार


## ऐतिहासिक आदिवासी संस्थान

महाराष्ट्र राज्याच्या ठाणे जिल्ह्यातील, ठाण्यापासून सु. ८० किमी. ईशान्येस वसलेले याच नावाच्या तालुक्याचे प्रमुख ठिकाण. ही भूतपूर्व जव्हार संस्थानाची राजधानी होती. १९६१ च्या राज्यपुनर्रचनेनंतर जव्हार एक तालुका बनविलेला आहे. येथील हवा थंड व निरोगी म्हणून विशेष प्रसिध्द आहे. जुना राजवाडा व नगारखाना हे आता पडीक आहेत. नवा राजवाडा प्रेक्षणीय आहे. येथून सु. १६ किमी. वर भोपटगड नावाचा किल्ला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पत्नीचे हे माहेर असून त्यांचे वडील संस्थानकाळात श्रेष्ठ पदावर होते.

**जव्हार संस्थान :** ब्रिटिशांकित हिंदुस्थानातील महाराष्ट्रात असणारे एक जुने संस्थान. क्षेत्रफळ ८०३ चौ. किमी. लोकसंख्या सु. पाऊण लाख (१९४१). उत्पन्न सु. ९ लाख रुपये. ठाणे जिल्ह्याच्या ईशान्येस हे संस्थान वसले असून संस्थानाचा बहुतेक भूप्रदेश पठाराचा आहे. प्रथम हे संस्थान वारल्यांकडे होते. वारल्यांकडून जयाबा कोळ्याने १२९४ मध्ये ते मिळविले. जयाबानंतर त्याचा मुलगा नीमशाह गादीवर आला. १३४३ मध्ये दिल्लीच्या तुघलकांनी नीमशाहाला राजा ही पदवी दिल्यावरुन नवीन शक सुरु झाला. (५ जून १९४३) तो अखेरपर्यंत जारी होता. नीमशाहनंतर सु. दोनशे वर्षांच्या काळातील इतिहास ज्ञात नाही. पोर्तुगीजांशी युद्धे करुन कोळी राजांनी वसई ते डहाणू टापूवर अंमल बसवला. १७८२ पासून पेशव्यांनी दुसऱ्या पतंगशाहावर १,००० रु. खंडणी बसवली. इंग्रज व जव्हार यामध्ये कोणत्याही प्रकारचा तह झालेला नव्हता. खंडणी इंग्रजांनी माफ केली (१८२२) पण नवीन राज्याभिषेकाचा नजराणा कायम ठेवला. १८९० मध्ये संस्थानला दत्तकाचा अधिकार मिळाला. राजाला खून खटल्यांचा अधिकार होता. जव्हार हीच राजधानी होती व संस्थानात १०८ खेडी होती. ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचे पूर्ण नियंत्रण संस्थानवर असे. स्वातंत्र्यांत्तर काळात संस्थान प्रथम मुंबई प्रांतातील ठाणे जिल्हा आणि नंतर महाराष्ट्र राज्य यात समाविष्ट करण्यात आले.

(संदर्भ : मराठी विश्वकोश)

# जव्हारचे सुपुत्र प्रा. गं. बा. सरदार
## एक कृतीशील विचारवंत



महाराष्ट्रातील एक अग्रगण्य विचारवंत, ज्येष्ठ साहित्यिक, पुरोगामी चळवळीचे भाष्यकार, आधुनिक प्रबोधनाचे प्रवक्ते, व्यासंगी साहित्यिक आणि प्रभावी वक्ते, समाजमनस्क विचारवंत अशा विविध विशेषणांनी प्रा. सरदारांना संबोधले जाते.

२ ऑक्टोबर १९०८ हा सदरांचा जन्मदिवस. या दिवसाला अतिशय महत्त्व आहे. कारण हाच राष्ट्रपिता म. गांधीचा व भारताचे दुसरे पंतप्रधान लालबाहादूर शास्त्रींचा जन्मदिवस. त्यामुळेच की काय, गांधींची विचारसरणी व शास्त्रींची साधी राहणी या दोन्हींचा मिलाप सरदारांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला दिसून येतो. समन्वयवृत्ती, समतोल, समग्रलक्षी व मानवतावादी दृष्टी, निस्पृहता व खंबीरपणा या गोष्टी सरदारांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू आहेत. प्रा. सरदार हे मराठीचे अभ्यासक म्हणून प्रसिध्द असले तरी त्यांचे विश्लेषण समाजशास्त्रीय होते. मराठीचा अभ्यास व समाजशास्त्राचा व्यासंग यामुळेच त्यांना "समाजमनस्क विचारवंत" म्हटले जाते. ते काही दिवस पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्राच्या अभ्यास मंडळावर होते. एक मराठीचा प्राध्यापक समाजशास्त्राच्या अभ्यासमंडळावर ही घटना प्रथमच घडली.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ही संस्था त्यांनीच घडविली व त्यांच्याच मार्गदर्शनाखाली वाढली. सरदार आज जरी आमच्यात नसले तरी त्यांची स्मृति सतत आम्हाला प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणार आहे.

*आदरणीय अण्णांच्या जन्म-शताब्दीच्या निमित्ताने त्यांना ही भावपूर्ण आदरांजली.*

ठाणे जिल्ह्यातील जव्हार येथे २ ऑक्टोबर १९०८ रोजी गंगाधर बाळकृष्ण उर्फ गं. बा. सरदार यांचा जन्म झाला. सर्वजण आदराने त्यांना 'अण्णा' म्हणत. वडील व्यापार व सावकारी करायचे. व्यवसायाबरोबरच सामाजिक नीतीमूल्येही त्यांनी जोपासली होती. व्यापारात मिळविलेला पैसा त्यांनी आदिवासींच्या कल्याणासाठी वापरला. वडिलांच्या या सामाजिक कार्याचे संस्कार त्यांच्यावर लहानपणीच झाले होते. मध्यमवर्गीयांची ब्राह्मणी चौकट झुकारुन देऊन सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीतून वेगळी वाट शोधण्याचा निर्णय त्यांच्या मनाने घेतला. जव्हारच्या प्राथमिक शाळेत व कृष्ण हायस्कूलमध्ये व्हर्नाक्युलर फायनलपर्यंतचे त्यांचे शिक्षण झाले.

जव्हारच्या रमणीय अशा निसर्ग सान्निध्यात आणि विविध जातीधर्मांच्या मुलांमध्ये त्यांचे बालपण गेले. त्यामुळे सामाजिक भेदभावनेचा स्पर्श त्यांच्या मनाला झाला नाही. उलट तेथील दारिद्र्यग्रस्त आदिवासींच्या वास्तवदर्शक जीवनाने त्यांच्या मनात भूतदया निर्माण झाली. इंग्रजी शिक्षणासाठी मुंबईच्या छबिलदास हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. जव्हारमधील आदिवासींचे जीवन आणि मुंबईच्या प्रगत जीवनाने त्यांना सुधारणेची दिशा मिळाली.

उच्चशिक्षण घेण्यासाठी वडिलांनी अण्णांना पुण्यात पाठविले होते. परंतु बी. ए. ची परीक्षा तोंडावर आली असतानाही ते सत्याग्रहात भाग घेण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांच्या तुकडीत दाखल झाले. ही गोष्ट घरी कळताच त्यांच्या आई-वडिलांना मोठा धक्का बसला. त्यांना या निर्णयापासून परावृत्त करण्याचा वडिलांनी बराच प्रयत्न केला. अखेर वडिलांच्या इच्छेसाठी सत्याग्रहातून बाहेर पडून ते घरी परत गेले. परीक्षा तर बुडालीच पण पुढे सत्याग्रहात भाग घेता येणार नाही यामुळे त्यांना वैफल्य आले. ब्रह्मचारी राहून लोकजागृतीचे कार्य करावे, असे त्यांना वाटू लागले. अखेर प्रत्यक्ष कृतीपेक्षा मनन-चिंतन हेच आपल्या प्रकृतीला मानवेल हे त्यांच्या लक्षात आले. म्हणून प्रत्यक्ष राजकारणात सहभागी न होता समाजाला कृतीशील वैचारिक बैठक देण्यासाठी सामाजिक प्रबोधन हे आपल्या कार्याचे स्वरूप त्यांनी निश्चित केले.

प्रसिद्ध समाजसेवक डॉ. सुधीर फडके हे त्यांचे बालपणीचे मित्र. त्यांच्या सहकार्याने त्यांनी जव्हारमध्ये शिवमंडळाची स्थापना केली. या मंडळाच्या माध्यमातून शिवजयंती उत्सव, गणेशोत्सव, अस्पृश्यता निवारण, नाटक, क्रीडा स्पर्धा असे समाजजागृतीचे उपक्रम सुरू केले. दारिद्र्यात असणाऱ्या आदिवासी मुलांनी शिक्षण घ्यावे असे त्यांना वाटे. अरे आपण शिकतोय, पण या आदिवासींना कोण शिक्षण देणार असे डॉ. फडके यांना ते म्हणत. याचबरोबर शंकर लोखंडे या आदिवासी मित्राला शिक्षण देण्यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले.

सरदार स्वत: उत्तम खेळाडू होते. स्वामी रामतीर्थ, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद यांच्या

विचारांचा त्यांच्या मनावर परिणाम झाला होता. तसेच स्वा. सावरकरांच्या विचारांचाही प्रभाव काही काळ होता. मॅट्रिक झाल्यावर उच्च शिक्षणासाठी ते पुण्यात आले.

म. गांधींच्या विचारांनी ते इतके प्रभावित झाले की त्याप्रमाणे ते आचरण करू लागले. खादीचे कपडे घालण्यास त्यांनी सुरुवात केली. चप्पल न घालता अनवाणी फिरू लागले. सत्याग्रहात सहभागी होण्यास आई-वडिलांनी विरोध केल्यामुळे ते परत घरी गेले. याच काळात सुमतीबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला.

विवाहानंतर पुन्हा पुण्यात येऊन सर परशुरामभाऊ महाविद्यालयात बी. ए. ला त्यांनी प्रवेश घेतला. एम. ए. झाल्यावर नोकरी न मिळाल्याने पाच-सहा वर्षे ते घरीच होते. या काळात संतसाहित्य, म. गांधी व कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा अभ्यास केला. ज्ञानप्रसाराचे पवित्र कार्य करण्यासाठी पुण्यातील एस. एन. डी. टी. महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम करण्यास सुरुवात केली. येथे महर्षी कर्वे, मल्हार वामन जोशी यांसारख्या विचारवंत व व्यासंगी प्राध्यापकांचा सहवास त्यांना लाभला. अत्यंत निष्ठेने त्यांनी ज्ञानदानाचे कार्य पार पाडले. नोकरीच्या काळात एक दिवसाचीही रजा त्यांनी घेतली नाही.

सामाजिक दृष्टीने साहित्याचे चिकित्सक व अभ्यासू वृत्तीमुळे ते नामवंत प्राध्यापक म्हणून ओळखले जात. त्यांनी स्वतःच्या घरी काही काळ एक अभ्यास मंडळ चालविले होते. पु. ल. देशपांडे, मु. ग. पानसे या अभ्यास मंडळात येत असत.

निवृत्तीनंतर त्यांच्या लेखन आणि समाजप्रबोधनाच्या कार्याला वेग आला. अज्ञान आणि दारिद्र्य याने पोखरून गेलेल्या सामान्य माणसाच्या उद्ध्वस्त आयुष्याकडे पाहताना त्यांच्या विचारांचे व साहित्याचे स्वरूप निश्चित झाले. अस्पृश्यता निवारण, दलित साहित्य, श्रमिकांचे व आदिवासींचे प्रबोधन यांसारख्या सामाजिक चळवळींना योग्य अशी वैचारिक दिशा दाखविण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले.

त्यांनी स्वतःस महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीस व सामाजिक प्रबोधनास वाहून घेतले. त्यांचे एकूण २०-२५ ग्रंथ प्रकाशित झाले असून, त्यांच्या वैचारिक, समाजप्रबोधनात्मक व संतवाङ्मयविषयक ग्रंथांनी महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनास एक योग्य दिशा दाखवून देशाचे कार्य केले आहे. संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, संतसाहित्याची सामाजिक व राष्ट्रीय कामगिरी, अर्वाचीन मराठी ग्रंथांची पूर्वपीठीका, रामदास दर्शन, महाराष्ट्र जीवन, महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी, गांधी आणि आंबेडकर हे त्यांचे प्रसिध्द ग्रंथ आहेत.

अण्णा एक समाजमनस्क विचारवंत व प्रभावी वक्ते होते. मूलग्राही व शोधकबुद्धीने त्यांनी समाजपरिवर्तनासाठी परिणामकारक अशी व्याख्याने दिली. त्यांच्या भाषणात तत्त्व आणि व्यवहाराची

सांगड घातलेली असे. दलितांबद्दल त्यांना उत्कट सहानुभूती होती. त्याचबरोबर हे सगळे बदलायचे असेल तर दलित पुढाऱ्यांनी व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे असे ते ठणकावून सांगत. बार्शी येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना डॉ. आंबेडकरांचे नाव विद्यापीठाला देण्यात वावगे काय आहे ? असा प्रश्न केला. तसेच साहित्य संमेलन लंडनला घेण्याऐवजी खेड्यात जा. जिथे सामान्य माणूस आपली मायबोली बोलतो तिथपर्यंत संमेलने गेली पाहिजेत असे त्यांनी सांगितले. त्यांच्या सामाजिक व साहित्य क्षेत्रातील कार्याबद्दल रामशास्त्री प्रभुणे सामाजिक न्याय पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले.

मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना महाराष्ट्र इतिहास मंडळात काम करण्यासाठी विचारले होते, तेव्हा ते म्हणाले, 'गतकाळचा संदर्भ शोधण्यापेक्षा मला खेड्यातील व तळागाळातील बांधवांचे जीवन उजळले पाहिजे याचा ध्यास आहे. त्यांच्यासाठी काही करावे असा संकल्प मी केलेला आहे. तेव्हा मला माफ करा.'

सामाजिक परिवर्तन व प्रबोधनास वैचारिक दिशा देण्यासाठीच त्यांनी साहित्यसेवा केली. ते निवृत्त झाल्यावर काही मित्रांनी त्यांच्या कार्याबद्दल त्यांना थैली अर्पण करण्याचे ठरविले होते. 'अहो, मी समाजासाठी फारसा काही करू शकलो नाही. जी थोडीफार धडपड केली त्यात कृतज्ञतेचे समाधान आहे. ही थैली मी स्वीकारली तर मी समाधान गमावून बसेन. समाधानाने मला जगू द्या.' असे सांगून ती थैली स्वीकारण्यास त्यांनी नम्रपणे नकार दिला. त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवसादिवशी 'परंपरा आणि परिवर्तन' हा त्यांचा लेखनसंग्रह प्रसिद्ध करण्यात आला. त्यानंतर महिनाभराने ते आजारी पडले. त्यांना दम्याचा बराच जुना विकार होता. त्यातच १ डिसेंबर १९८८ रोजी पुणे येथे त्यांचा मृत्यू झाला. सामाजिक परिवर्तन व नवसमाज-निर्मितीसाठी साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याची महत्त्वपूर्ण दिशा व विचारांचा महान ठेवा त्यांनी साहित्यिक व सामाजिक कार्यकर्त्यास दिला आहे.

❐ ❐ ❐

*आदिवासींविषयी, त्यांच्या दारिद्र्याविषयी सरदारांना विलक्षण तळमळ होती. आणि म्हणूनच आम्ही त्यांना आमच्या परिषदेचे अध्यक्ष होण्याची विनंती केली. सरदार अध्यक्ष असतानाच त्यांनी आदिवासी प्रश्नांना वाहिलेले नियतकालिक परिषदेने सुरु करावे हा विचार उचलून धरला व १९८० साली हाकारा नियतकालिक सुरु झाले. हाकारा हे नाव त्यांनीच सुचविले. हाकारा चा अर्थ साद घालणे, एकजूट करणे. सगळ्या लोकांनी एकत्र येऊन एकजूट करावी, साद घालावी तरच अदिवासींच्या समस्या सुटण्यास मदत होईल ही भावना हाकारा सुरु करण्यामागे सरदारांची होती.*

*– संपादक*

# होळी

**कै. ग. ये. मुकणे (गुरुजी)**
राजगुरु, जव्हार संस्थान
महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त

सन १९४८ पूर्वी जव्हार तालुका हा संस्थान म्हणून ठाणे जिल्ह्यात एका आदिवासी महादेवकोळी राजाच्या ताब्यात होता. तेव्हापासून जव्हार या राजधानीचा शहरी व ग्रामीण अशा वस्तीचा हा मुलुख असून राजघराणे व राजवैभवाला साजेसे सण व धार्मिक विधी मराठेशाहीला अनुरुप अशा चालीरीतीला धरुन होत असत. त्यावेळी संस्थानी जमान्यात राजा-प्रजा शहरी भागात हा होळीचा सण कशा प्रकारे साजरा करीत होती हा परामर्श घेऊन शेवटी विशेष महत्वाचा होळीचा सण आदिवासी डोंगरी ग्रामीण भागात कशा प्रकारे साजरा होतो याची मीमांसा करणार आहे.

राजधानीचे आज तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या जव्हार शहरात प्रमुख्याने होळी पेटविण्याची प्रसिध्द ठिकाणे ठरलेली होती व आजही आहेत; (१) सरकारी होळी (२) मारुती आळी; (३) सरकारी खाजगी जुन्या राजवाड्यातील (४) नं. १ च्या सरकारी होळीच्या भागांत हल्लीचे नवबौद्ध समाजाची (५) हरिजनांची (६) मांगेली आळीची (७) ढोरकोळी जमातीची (८) महादेव आळीची (९) महालक्ष्मी आळीची अशा आळी आळींची होळ्यांची पध्दत आज चालू आहे. या सर्व होळ्या फाल्गुन शु॥ १४ ला धाकटी (कोकट) होळी व फाल्गुन शु॥ १५ ला मोठी सणाची होळी होत असते.

विशेषतः फाल्गुन शुध्द १५ ला सरकारी मोठी होळीची पध्दत त्यावेळच्या राजाच्या आज्ञेने साजरी कशी होत असे ही माहिती करुन घेऊ या.

फाल्गुन शु॥ १४ ला धाकटी होळी एरंडाचे झाड पुरुन लाकडे रचून त्या त्या आळीतील होळकर मोठ्या आनंदाने साजरी करतात. मोठ्या होळीला सर्व साहित्य राजदरबारी थाटाचे राजाकडून पुरविले जाई. त्यावेळी भरपूर जंगल असल्याने खास मोठा बांबूचा खूप ऊंच सरळ निकोप असा होळीचा खांब आणला जात असे. सरकारी घोडके, गडी व वाकणवीस यांनी सर्व साहित्य आणून होळीच्या त्या बांबुला पापड्या, हार, नारळ व एक कोंबडीचे पिलू बांधुन खूप लाकडे लावून संध्याकाळी होळी रचली जात असे. ब्राम्हण राजगुरुच्या सल्ल्याने होळीची पूजा व पेटविणेचा मुहुर्त ठरविला जाऊन त्याप्रमाणे राजे महाराज सर्व तयारीनिशी प्रमुख अधिकारी वर्ग, सरदार, मानकरी, गावंकरी, व्यापारी गोर-गरीब सर्व जातीचे लोक नोकर चाकर, पोलीसपथक, वाजंत्री होळीवर जमून ठरलेल्या मुहुर्ताप्रमाणे राजेमहाराज होळीची ब्राह्मण राजगुरुकडून स्वहस्ते शास्त्रोक्त पुजा अर्चा करीत. पुजा झाल्यानंतर होळी पेटविण्यास लागणारा विस्तव हा प्रथम महार होळीचा हल्लीच्या नवबौध्दाच्या ''होळीचा'' न्यावा लागे. याकरिता प्रथम मान असलेली महारांची होळी पेटविली जाई

व तोच विस्तव पेटलेली शेणगोवरी मोठ्या सरकारी होळी पेटविण्यास लागत असे. श्रीमंत महाराज होळी स्वहस्ते पेटवून होळीला प्रदक्षिणा घालून उभे रहात असत. नंतर दुसरा प्रकार म्हणजे होळीच्या बांबूच्या उंच खांबाला बांधलेले कोंबडीचे पिलू पोलीसांकडून बंदुकीने नेम धरुन मारले जाई अगर पाडले जाई हा नेम ज्या पोलीसाचा लागला जाई त्याचे शाबासकी देऊन कौतुक होई नवीन जमान्यांत (पिलू बांधणे बंद करुन) नारळ बांधून कार्यक्रम होत असे.

होळीचा खांब पडल्याशिवाय स्वारी निघत नसे खांब पडल्यावर तो तोडून अर्धाभाग शेंड्याकडील होळी भोवती फिरविला जाऊन होळीच्या राखेचा अंगारा लावून सरकारी लवाजमा राजवाड्यांतील खाजगी होळीच्या पूजेसाठी जात असे.

सरकारी होळी पेटल्यानंतर शहरातील सर्व भागातील आळ्यांतील होळ्या पेटवून नैवेद्य पूजा इ. कार्यक्रम साजरा होई.

ग्रामीण भागातील होळीचे ४/५ दिवस मजेचे मानून खेड्यांतील आदिवासी जमावाने निरनिराळी पेहेरावाची सोंगे घेऊन पोस्त मागण्यासाठी २/३ दिवस ग्रामीण भागांत तसेच शहरी भागात दारोदारी नाचून सोंगाची नक्कल करुन फिरतांना दिसतात. या पेहेरणाला रंगपंचमीच्या दिवशी विशेष मजा करतात. पेहेरवाणाला, ढोलनाच, कहाळ्या संभळ वाजवून होडीनाच, वैयक्तिक मुसळ्या, साधु, साहेबीथाट, स्त्रीपार्ट, नाच्यापोऱ्याचा तमाशा-नवरा-नवरी बाशींग बांधून फिरणे, अस्वल, अंगाला काळीमस-राखाडी फासून नाक मोठे दाखवुन भेसूरपणा, मांदोळ एका देवाच्या-देवीचा फोटो गळ्यांत अडकवून भिकारी होणे याप्रमाणे जी कल्पना मनात येईल त्याप्रमाणे सोंग काढणे शिमग्याचा पोस्त रक्कम जमा झाल्यावर शेवटी बटाटे, कांदे अगर बोंबील मासळी खरेदी करुन त्याचे आपआपसात वाटप केले जाई. सोंग घेताना अगदी टाकावू, घोंगडी, चिरगुटे, फाटक्या कपड्यांचा व जंगली वस्तूंचा उपयोग करतात. पेहेरवाणांत ठेक्यावर ढोल वाजवून भाईरो-भाईरो असे आवाज काढून हातवारे करुन नाचतात. अलिकडे ढोल, ड्रम, कहाळी, ताशा या वाद्यांचाही उपयोग करतात. आदिवासी ग्रामीण होळीवर मुले ओल्या गारभेंडी, आंबट डिंग्री यांचे ओले फोक आणून पेटलेल्या होळीच्या जाळात थोडे तापवून होळीच्या शेजारील शीळेवर आपटून फटाक्यासारखे बार काढतात.

या होळीच्या सणाला मोठ्या होळीच्या दिवशी फार करुन आरवत असा कोंबडा व भात-भाकरी हे जेवण गरीबा पासून तो गावातील श्रीमंत आदिवासी शेतकरी कसेही करुन करतात. एरवी घरांतील वाढवलेले कोंबडे शहरात विकून पैसे कमवतात पण शिमग्याचा या सणाला खास लहान मोठे कोंबडे बटाटे भरीला घालून भाजी करुन जेवतात.

त्याच बरोबर त्यांच्या रीती प्रमाणे काही जुनी-नवी मंडळी दारुचा उपयोग करताना दिसतात सणात सण म्हणून शहरी भागातही रंगपंचमीच्या सणाला रंगात रंग असतोच.

**ग्रामीण आदिवासींची होळी**

जव्हार तालुक्याचा थोडा शहरी भाग सोडता बहुतेक गावे व पाडे जंगलपट्टीत असून बऱ्याच काळापासून होळीची प्रथा आदिवासी भागात अस्तित्वात आहे. फाल्गुन महिन्याला आदिवासी

शिमग्याचा महिना संबोधतात. शिमगाच्या महिन्याला 'मोडा' म्हणजे इतर शेतीची कामे न करता होळीपासून सु. ४/५ दिवस सण साजरा करण्यात घालवितात. काही आदिवासी शिमग्याच्या मोड्यांत मुलां-मुलींची लग्नेही उरकून घेतात. होळीच्या मोडा झाल्यावर बहुतेक शेतकरी शेतीत बांधबंदिस्ती, शेतासाठी गवत, पाला जमवून शेताच्या पेरणीसाठी राबणीची कामे करतात. कारण अखेरचे दिवस असल्याने कामाचे दिवस फुकट घालवायचे नाहीत अशी काही शेतकऱ्यांची पूर्वीपासून वहिवाट आहे.

ग्रामीण खेडेगावात प्रत्येक मुख्य गावी व पाड्यात आदिवासी जमातीची होळी असते. काही ठिकाणी गावाच्या लगत होळीची जागा ठराविक असून ती राखीव असते. पूर्वी माघ शु॥ २ माहीबीजा हा आदिवासींचा सण सुरु होताच लहान प्रमाणात होळी रोज पेटविण्याची चाल आहे. बहुतेक गावी ज्या ठिकाणी होळी पेटविली जाते, तेथे नवीन वर्षाच्या होळीच्या खांबाचे खुंट पुरुन ठेवतात. नवीन वर्षाला जुने खुंट काढून होळीबरोबर जाळतात व नवे पुरुन ठेवतात.

प्रत्येक गावांत सर्व जमातीचे लोक लाकूड फाटे आणण्यासाठी जंगलात जातात. तसेच तरुण बांडगे मोठ्या होळीचा खांब आणतात. कोकट होळी धाकटी व पौर्णिमेची मोठी होळी पेटवून नैवेद्य दाखविणे नारळ, गुळ-वाटी होळीत टाकणे बोंब मारत फाका खालणे व होळी भोवती ढोल वाजवून नाचणे-खेळणे व मनसोक्त आनंद लुटणे हा भाग खेड्यावर जास्त चालतो. तरुण-तरुणी लहान मोठी मुले बांबूच्या पोकळ नळ्यांत पाणी भरुन एकमेकांना पाणी फेकून भिजविणे मौजेचे मानतात. धुळवडीला धूळ, पाणवळीला पाणी, शेणवळीला अंगावर शेण टाकून मजा करतात. गावांत होळीचे पोस्त मागतात.

बहुतेक खेडेगावांत होळी पेटविण्याचा मान पोटीस पाटिल, गावचा कारभारी यांचा असतो. होळीच्या सणांत भांडण तंटा होऊ नये म्हणून पो. पाटील, गावची काठेमंडळी (कोतवाल) हे जागरुक असतात. आपल्या गावच्या होळीचा सण साजरा करुन काही आदिवासी पोस्त जमविणे कामी पेहेरेवान म्हणजे निरनिराळी सोंगे काढून ती सोंगे नाचवत व गावोगावं फिरत. होळी पौर्णिमेपासून सु. ५ दिवस होळीचा सण साजरा करण्याची रीत या भागात आहे. (१) पौर्णिमेस मोठी होळी (२) वद्य १ धुळवड (धुळीवंदन) (३) व॥ ३ पाणवळ (४) शेणवळ व॥ ५ (५) रंगपंचमी.

होळीच्या दुऱ्या दिवशी श्रीमंतराजे व सर्व गावकरी मोठ्या सरकारी होळीवर सकाळी ८/९ च्या सुमारास जमून धुलीवंदन साजरी करत असत. त्यावेळी राजे पेटत्या होळीत गुलाल उधळून नंतर सर्व प्रतिष्ठीत गावकरी एकमेकांच्या अंगावर आनंदाने गुलाल उधळून स्वारी मुख्य रस्त्याने मारुतीच्या होळीपासून नगरशेट छबीलदास यांच्या होळीवरुन खाजगी सरकारी होळीवर वाजत गाजत जाऊन धुलीवंदनाचा कार्यक्रम विसर्जन होई.

नंतर व॥ ५ रंगपंचमीचा राजदरबार राज निमंत्रित सरदार, अधिकारी, गावातील व्यापारी, सर्व वरिष्ठ-कनिष्ठ नोकरांसह रात्रौ जुन्या राजवाड्यात रंगपंचमीचा दरबार महाराजांच्या उपस्थितीत भरविला जाई. त्यांत मानाने राजाला मुजरे झाल्यानंतर पानविडे, अत्तर गुलाब व केशर मिश्रित सुगंधी पाणी रंगपंचमीचा

रंग म्हणून गुलाब दाणीतून शिंपडला जाई. नंतर पाण्यानी रंगांनी होळी विझवून या सणाची समाप्ती होत असे. ४/५ दिवस शहरांत रात्रंदिवस बंधु-भावानी प्रेमाने न रागावता सहनशीलतेने निरनिराळे देशीखेळ जुने-आट्यापाट्या, हुतुतु, गोटे उचलणे, असे शक्ति-युक्ति प्रदर्शनाचे खेळ खेळून होळी जागवून आनंद लुटीत तसेच शहरा लगतच्या आदि-वस्तीतील हौशी होळकर पुरुष स्त्रीपार्ट घेऊन बंदरपट्टीकडील होडीचानाच वाजंत्री लावून गावात पोस्त मागत फिरत असे. काही हौशी तमासगीर पोऱ्यानाच्याचा तमाशा काढून हौस मौजेने या सणाचा सोहळा साजरा करण्याची प्रथा होती.

**फाका घालणे चढाओढीच्या-**

रानांत फुलला पळस रे पळस-आमचे होळीला सोन्याचा कळस, एखाद्याचे नाव घेऊन.........च्या बैलाला होऽऽ. सांगावारे सांगवा सायबापाशी मागावा-सायबानी दिली चिठ्ठी......नि......झाली मिठ्ठी या जुन्या गुढ फाका घालण्याच्या रीती जुन्या जमान्यातील नवीन जमाना व होळीची पध्दत सुधारते आहे. आनंद वाटतो पण जुने मर्दानी-मैदानी खेळ होळीकर विसरलेसे वाटते.

आदिवासी होळीकर पोस्त मागताना पुढील गाणे म्हणतात.

खटखुबा दारीच उभा !
आज्या आज्या खटखुबा-दारी उभा ॥१॥
तारादेव का, मारा देव-नाचरे सुकुरदेव ॥२॥
चाड्यातली भेंडी-हातभर शेंडी ॥३॥
वाड्यातली कुंभई-दिसते मुंबई ॥४॥
घराचा वासा-घरधनी कसा ? ॥५॥
घराचा कौल-घरधन्याला हाऊल ॥६॥
गेलो होतो खडकी-विसरलो फडकी॥७॥
गेलो होतो वनी-विसरलो फणी ॥८॥
चासगाव पांगरी-वाजविली घांगरी ॥९॥
वाड्यातली वाळकी-ससा पळ नळकी ॥१०॥
सशाची रस्सी-भगरीशी कशी ? ॥११॥
शेणाचा टोपला-डोसा कोठं लपला ॥१२॥
घराचा चिमटा-धरधनी हिमटा ॥१३॥

❒ ❒ ❒


**हाकारा : (फॉर्म ४, नियम ८ नुसार निवेदन)**
१. प्रकाशन स्थळ : महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७
२. प्रकाशन काळ त्रैमासिक
३. मुद्रक व प्रकाशक : रामचंद्र केशव मुटाटकर
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.
४. संपादक : रामचंद्र केशव मुटाटकर
स्वामित्व : महाराष्ट्र मानव विज्ञान
पत्ता : ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.
५. स्वामित्व : महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.
मी रामचंद्र केशव मुटाटकर, जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

रा. के. मुटायकर
प्रकाशक



# जव्हार तालुक्यातील जगदंबेचा उत्सव बोहाडा

कै. ग. ये.मुकणे (गुरुजी)
राजगुरु, जव्हार संस्थान,

हल्लीचा जव्हार तालुका सन १९४८ पूर्वी संस्थान असताना जव्हार या राजधानीच्या नगरात सरकारी बोहाडा (जगदंबेचा) उत्सव दर वर्षाला चैत्र अगर वैशाख महिन्यात जुन्या राजवाड्याच्या मागील रस्त्यावर महादेव आळीच्या रोडवर सरकारी खास चांदणी म्हणजे कापडी छताचा मंडप नक्षी केलेल्या कापडाचा, झालर असलेला, हंड्या, झुंबर, पताका लावून कमानी उभारुन केला जात असे. बोहाड्यात निघणारी सोंगे मुखवटे लुकणाचे कला कौशल्यपूर्ण तयार केलेले होते. दर वर्षाला खास पेंटरकडून ती रंगविली जात असत. त्यावेळी विजेची सोय नव्हती. रात्रौ टेंभे व मशाली सारखे पत्री हिलाल व त्यात रॉकेलमध्ये भिजवलेल्या शेण गोवऱ्या यांचा उपयोग उजेडासाठी केला जात असे.

प्रत्येक सोंगाला साजेसे कपडे झगा, शेरवानी, साडी, फेटे खास जरीचे भारी किंमतीचे राजेशाहीनुरुप खास पुण्याहून वा इतर ठिकाणावरुन कायम आणून ठेवले होते. बोहाड्याचा आरंभ (थाप) स्थापना शनिवारी रविवारी धाकटा, सोमवारी मोठा व मंगळवारी देवीचे सोंग या प्रमाणे आयोजन असे. या उत्सवाचा खर्च राजघराण्याकडून केला जात असे. या सरकारी बोहाड्यात सोंगे घेणारे इसम राजघराण्यातील व घोडपागेतील खास घोडके मंडळी सोंगे योग्यते प्रमाणे नाचवीत असत. या बोहाड्यात संवाद (संपादनी) फारशी होत नसे. मात्र प्रत्येक दिवशी राजा-राणी आपल्या महालातून हा उत्सव पाहण्यासाठी खास येऊन बसत होते.

हा सरकारी मानाचा उत्सव झाल्यानंतर खास गावाचा मारुती आळीचा , पो. चावडी जवळील छबिलदास शेट यांचा असे दोन नाटकी बोहाडे राजाश्रयाने होत असत.

प्रमुख गावकरी व व्यापारी मंडळी यांची त्यांच्या खास आंवडीप्रमाणे सोंगे ठरलेले असे. बोहाड्यात खालीलप्रमाणे सोंगे व काही पौरोणिक प्रसंग शहरी उत्सवात दाखविले जात असत. हल्ली फक्त बोहाडेचा होतात.

माझ्या माहितीप्रमाणे प्रत्यक्ष पाहिलेली सोंगे व त्यांचा क्रम लिहून नंतर प्रत्येक सोंगाची माहिती नाच, पध्दत, वाजंत्री ताल इत्यादी विवरण करणारा आहे.

पूर्वी नेमकीच मुख्य सोंगे होती. हल्ली या दशावतारांतील सोंगामध्ये नवीन भर पडून उत्सव ग्रामीण भागात साजरा होत असतो.

**सोंगाचा क्रम (जुना नवा)**

(१) आंबापालवी, (२) नाऱ्याब्राह्मण, (३) गणपती, (४) सरस्वती (५) मारुती (६) सटवाई देवी (७) रक्तादेवी (८) एकादशी (९) पांडवताटी (नवीन) (१०) कौरवताटी (नवीन) (११) मासा (मत्स्य) (१२) भीम (१३) काळोबा (१४) भैरोबा (१५) काळभैरी (१६) चारणीन (१७) डुकराचे पारधी (१८) शिवाजीचे (नवीन) (१९) बाळंतणीचे (नवीन) (२०) रामजन्म (२१) श्रावणबाळ (२२) खंडेराव महाराज (मुख्यसोंग) वाघ्या मुरळी (२३) राम-लक्ष्मण-सीता (२४) रावणताटी (२५) हिडींबा (२६) वेताळ (२७) नरसिंहअवतार (२८) चंद्र-सुर्य (२९) कासव, (नवीन) (३०) अग्नीदेव (नवीन) (३१) वाघ (नवीन) (३२) घोडा (नवीन) (३३) माकड (३४) देवीचे प्रमुख सोंग महिषासूर या सोंगाच्या संख्येवरुन म्हण पडली आहे ती रात्र थोडी नि सोंगे फार.

मात्र या दशावतार बोहाड्यात ही सोंगे जरुरी प्रमाणे ठराविक काढण्याची पध्दत दिसते.

थाप (स्थापना पहिला दिवस आरंभ म्हणून ५/६ सोंगे काढतात दुसरा दिवस धाकटा बोहाडा पहाटे पर्यंत आणि मोठा बोहाडा सर्व सोंगे सकाळी ८/९ वाजेपर्यंत उत्सव चालतो).

बोहाड्याबद्दल प्रत्यक्ष पाहिलेल्या सोंगाचा वेष, नाच, वाद्य पध्दत वाजंत्रीचा ठेका व सोंगाची संपादणी (भाषण, संवाद) आवेश याची ओळख ग्रामीण व शहरी सोंगाची क्रमवारी.

**(१) आंबापालवी**

ह सोंग सगळ्या अंगाला आंब्याच्या डहाळ्या बांधुन हातात आरतीचे ताट घेऊन साऱ्या बोहाड्याच्या भागात मिरविले जाते. हेतु हा की मंगलदायक वातावरण निर्माण करणे.

**(२) नाऱ्या ब्राह्मण**

वेष : ब्राह्मणी, हातात पंचांग व टेकण्यास काठी, पगडी घातलेला जुन्या परंपरेतील राहणीचा सूत्रधार या नात्याने मिरवतात. नंतर चांदणीमध्ये बसवून श्रीगणराज यांचे आगमन व मिरवणूक निघते.

**(३)श्री गणपती (गणेश पूजन व आराधना)**

वेष : साधारण ८ ते ९ वर्षाचा मुलगा हे सोंग घेतो.

वाद्य ठेका : पायाला घुंगऱ्या (घागऱ्या) बांधलेल्या मोरया रे बाप्पा मोरया रेऽऽ या सुरांत दुडक्या चालीत नाऱ्याब्राह्मणासह हे सोंग मिरवून परत चांदणी मध्ये आणून आराधना करुन पूजा करतात शहरी भागांत भाषण होते: सुत्रधार म्हणतो-हे गणराया हा सूत्रधार तुजप्रत वंदन करतो.

गणपती :- सुत्रधारा तुझे कल्याण असो. हे सुत्रधारा आज आम्हांस पाचारण करण्याचे कारण काय ते आम्हांप्रत कथन करा.

सूत्रधार :- हे गणराया गणपते आम्ही आजपासून या जव्हार नगरात सालाबादप्रमाणे श्री जगदंबेचा उत्सव करण्याचे ठरविले आहे. त्यांत सोंगे घेणारी पात्रे अज्ञानी असून ती सज्ञान होऊन सर्व कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडो व आपली कृपा व्हावी अशी विनंती आहे.

गणपती :- सुत्रधारा तुमचे सर्व कार्य निर्विघ्नपणे पार पडेल चिंता नसावी.

मात्र असे करा की ब्रम्हगिरी पर्वतावर ब्रम्हकुमारी वीणावादिनी सरस्वती गायन करीत आहे. तिची आराधना करुन या कार्यास घेऊन या म्हणजे तुमचे इच्छित कार्य अधिक यशस्वी होईल.

(गणपती, नाऱ्याब्राम्हण चांदणी मंडपात बसून असतात)

**(४) सरस्वती**

वेष :- मोराचे सोंग ओटीवर बांधलेले मागे मोराचा पिसारा डोक्यावर किरीट (तरुण सुंदर स्त्रीवेषात असते) हातात रुमाल.

वाद्यसुर :- हे नाच सारजाबाईऽऽ ब्रह्माची कुमारी सारजा बसून मोरावरीऽऽ हे नाच सारजाबाईऽऽ.

नंतर तिन्ही सोंगाची पूजा होऊन ते गमन करतात.

**(५) मारुती (लंकादहन कल्पना)**

वेष :- या सोंगासाठी शरीरयष्ठी मजबूत व पिळदार दंड असलेली व्यक्ती पसंत करतात. कपडे कमी लंगोट भिडलेला, हातात गदा, शेपटी तारेची बाकदार चिंध्या गुंडाळुन गोंडा पेटविलेली, मुखवटा मारुतीरायाचा हूपऽऽ.

वाद्य सूर :- मारुती मारुती, दया करा हो पुरती बाप्पा मारुतीऽऽ......ऽऽ (मारुतीराया येऊन बसतात) नंतर - लढायला राक्षस – जंबुमाळी येतो. त्यास मारुती ठार मारतो मारुतीची पूजा आरती होऊन गमन करतात.

**(६) सटवाई देवी :** स्त्रीवेश-पायाला चाळ

वाद्ये-सूर :- बायकी थाटात फुगडी घालून नाचवितात.

वाद्य ताल :- सटवायबाय नाचते पोटी पाटी मागते-गऽ पोटी पोटी पाटी मागते-

मिरवणुकी नंतर राक्षसाशी लढाई होऊन गमन करते.

**(७) रक्तादेवी :** नवीन सोंग

सटवाई प्रमाणे स्त्रीवेषात मिरवून राक्षसाशी लढाई होते.

**(८) एकादशी**

वेष :- आटोपशीर, केस सोडलेले, डोक्याला किरीट, नथ, मुखवटा नाही मेकअप केलेले, पाठीला आरसे व कागदी तुरे लावलेली सुपासारखी अर्धवर्तुळाकार पाटी (कांबीचा) अशा थाटांत हे सोंग

चालत, नाचत, हातात दोन तलवारी घेऊन नाचत असते-वाद्य चाळा जोरदार समळदोन.

राक्षसी ताल :- मृदुमाने राक्षसाशी लढाई होते. (ही सोंगे ठराविक घराण्यात नाचविण्याची प्रथा आहे)

**(९) पांडव ताटी**

(नवीन सोंग) (पाच पांडव ५ मुखांचे सोंग)

ही ताटी डोक्यात किरिटाप्रमाणे घालून नाचवितात. वाद्य-ताल ठेक्यात असतो. फक्त नाचून मिरवितात. लढाई नाही.

**(१०) कौरव ताटी**

पांडव ताटी प्रमाणे नाचवितात (नवीन महाभारताचा भाग समजू या)

**(११) मत्स्यअवतार– मासा**

कमरेत घालून हे माशाचे सोंग नाचवितात. कल्पना शंखासुराशी लढाई होऊन देव संकट दूर करतो.

या प्रत्येक सोंगाचा ताल-सुर-ठेका वेगळा असतो हे वाजंत्री वाले बरोबर जाणतात व सोंग घेणारे जाणतात हे विशेष वाटते.

**(१२) भीम-बकासुर :** (मुखवटे नसतात)

हे दोन्ही पार्ट घेणाऱ्या व्यक्ती भीम, मारुती प्रमाणे धष्टपुष्ट बांध्याचा निवडून भीमाचे सोंग घेतो- बकासुर नावा प्रमाणे भयाण व राक्षसी दणकट असा असतो-भीमाचावेष-डोक्यावर शीरपेचवाली पगडी लंगोट भिडलेला व जांघ घालून कमरेला शेला गदाधारी पिळदार मिशी, असा भव्य वेशांत बैलगाडीवर चोपाळा अगर फळ्या बांधून त्यावर भीमाचे सोंग काढतात. बकासूर आधीच येऊन बसलेला असतो. भीम गाडीतून उडी मारुन चांदणीत उतरतो व गाडी परत नेतात भीम बैठक मारुन ते गाडाभर अन्न खातो असा देखावा पाहून बकासुर चिडतो व भीमाच्या पाठीवर बुकलू लागतो व मोठ्याने ओरडतो (संपादणी भाषण)

बकासूर:- अरे मानवाच्या कार्ट्या, माझे एक गाडाभर अन्न, एकरेडा व एक माणूस एवढे अन्न खाणारा तू कोण?

भीम :- अन्न खातच असतो व म्हणतो

माझे खासे अंग रगडले जाते, माझे आटोपल्यावर घेतो तुझा समाचार. भीम दंड थोपटून कुस्तीला तयार होतो. कुस्तीत झटापट होते. बकासूरास भीम म्हणतो पाहू दे तुझे बळ! अवघड पेचात बकासूर बेशुध्द होतो उचलून नेतात भीम परत विजयी होऊन नाचत जातो.

ग्रामीण भागात सहसा हे सोंग व भाषणे होत नसतात. एका ग्रामीण भागात ऐकलेले भाषण नमुना पहा:-

बकासूर:- हे भीम सेना अरे माझा आन् खानारा तू कोण आहेस येजोस पाहू कुस्तीलं तयार होजोस.

पुढे झटापट होते.

**(१३) काळोबा**

**(१४) भैरोबा**

**(१५) काळभैरीव**

**(१६) चारणीन-व चारण:-मिरवणुकीचे सोंग**

वेश-चारणीन डोक्यावर होल असलेले खास मडके घेते व त्यात गोवऱ्या रॉकेल घालून पेटवित, चारण चकरीवर दोऱ्या वळवतो व म्हणतो "भाबी तांडा का गयाऽऽ चारणीन टिपऱ्या घेऊन नाचते नाच ठेक्यात चालतो (ताल-सुर-चारणीन आली दाराव बोंबील घ्यारे पोरा हो!) "

**(१७) डुकराचे सोंग**

वेष-अंगाला घोंगडी गुंडाळून सोंग बांधतात हात टेकून नाचतो एक धनु-कांड घेतलेला पारधी दाखवितात (ग्रामीण भागात निघते)

**(१८) शिवाजी**

हे नवीन सोंग अलिकडे काढून मिरवितात

**(१९) बाळंतणीचे सोंग**

(नवीन) पण ग्रामीण भागातील

पध्दत: मध्यम प्रतीची खाटले कमरेतून खांद्यात दोर अडकवून खाट सजवितात स्त्रीवेषात केस सुटलेले पाळण्यात खाटेवर बाहुली निजवितात. पायाला चाळ बांधून नाचतात, सोंग मिरवितात.

**(२०) रामायण भाग:-** श्रीराम जन्म (जुना बोहाडा)

हा भाग धाकट्या बोहाडयांत कौसल्या-दशरथ राजा स्टेजवर पाळणा बांधून रामजन्म झाल्यावर रामाचा पाळणा म्हणत असत. अलिकडे हा कार्यक्रम होत नाही विशेष करुन हा रामायणाचा भाग जव्हारला गावाच्या उत्सवात मारुती आळी बोहड्यात नाट्यीकरणाने होत असे. अलिकडे सर्व बोहाड्यात राम-लक्ष्मण काढतात.

**(२१) श्रावण बाळ व कावड (जुने सोंग रामायणा प्रमाणे)**

शहरी भागात पूर्वी हे सोंग पहाडी मंडळी पैकी जुने अनुभवी पार्ट म्हणून कावड, आंधळे आईबाप, श्रावणबाळ, दशरथराजा इत्यादी पात्रे निघत. पुढील प्रसंग-तहान लागणे : श्रावणबाळ भांडे घेऊन पाणी आणण्यास जातो. पशु समजून बाण मारला जातो. पुढील संभाषण : दशरथराजा बाण काढतो. त्याच्या आई-बापाला पाणी घेऊन दशरथराजा जातो. आवाज ओळखतात. दशरथराजा झालेला प्रसंग सांगतो. आई-बाप शाप देतात, पुत्र शोकाने मरशील इ. (संपादणीसह हे सोंग काढत )

**(२२) खंडेराव महाराज (उत्सवातील मुख्य सोंग)**

सर्व सोंगात देवीच्या खालोखाल हे सोंग मानाचे सर्व बोहाड्यात मानले जाते. शहरी बोहाड्यात श्री खंडेराया बरोबर वाघ्या-मुरळी काढतात (आभ-आभ आवाज) जय घोष होतो "खंडेराव महाराज की जय!"

वाद्यसूर:-खंडेराव जेजुरी नगरात-कोरेचंदनी महालात....... हे सोंग गावातील प्रमुख व्यक्तीच मानाने घेत असते. वर्गणी जादा द्यावी लागते. सोंगास कपडे भारी किंमतीचे व सोंग सोनेरी रंगाचे असते. खेड्यात हे सोंग निघताच काही स्त्री-पुरुषांच्या अंगात संचार होऊन ते घुमतात. टेंभ्याची लाईट, फटाके यांची आतषबाजी केली जाते. लढाईस आग्यावेताळ काढतात. पूजा आरती केली जाते.

## (२३) राम-लक्ष्मण-सीता: (रामायण भाग)

धनुर्धारी राम-लक्ष्मणाचे हे सोंग दोन तरुण घेतात. सीतेचा पार्ट बोहाड्या निमित्त आलेला तमाशातील नाच्या पोऱ्या करीत असे. (बोहाड्यात तमाशा येत किंवा खास सुपारी दिली जाई.)

राम-लक्ष्मण हे सोंग निघाल्यानंतर यांचा उपयोग-पूर्वी शुर्पनखा व हिडींबा यांचा संवाद होत असे. त्यानंतर राम-लक्ष्मणा बद्दल तक्रार रावणाकडे गेल्यावर रावण चिडतो व राम-लक्ष्मण यांना पकडून आणण्यासाठी (हुकूम सोडतो). त्यातच अशोक वनात सीता हा पौराणिक भाग व मारुती इ. भाग दाखविणेत येई. हल्ली फक्त राम-लक्ष्मण व रावण वध लढाई हा भाग दाखवून हिडींबा राक्षसीण हे भयाण हाती टेंभे घेऊन नाचणारे सोंग काढतात.

## (२४) रावणताटी दशमुखाचे सोंग

हे सोंग रावणाच्या सैन्यासह काढले जाई. राम-लक्ष्मण अगोदर आलेले असतात. रावण सैन्यासह चांदणीत येऊन बसतो. तसेच त्याचे सैन्यही एका बाकड्यावर बसविण्यात येई. नंतर रावण व सैन्य प्रमुख प्रधान, सेनापती यांची विचारपूस संभाषण होई. अगोदर मुजरे होत.

१ रावण:- प्रधानजी आपल्या राज्याचा बंदोबस्त कोणत्या प्रकारे ठेवलेला आहे ?

प्रधान:- महाराज उत्तम प्रकारे ठेवलेला आहे चिंता नसावी.

रावण:- शाब्बास प्रधानजी शाब्बास, बसावे.

सेनापती:- महाराज हा बालक आपल्या चरणाप्रत वंदन करीत आहे.

रावण:- कल्याण असावे. सेनापतीजी आपल्या सैन्याचा बंदोबस्त कोणत्या प्रकारे ठेविला आहे तो मज प्रत कथन करा.

सेनापती:- महाराज आपल्या सैन्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारे ठेवला आहे. सर्व सैन्याला सर्व प्रकारची हत्यारे देऊन दारुगोळ्यासह तोफखाना सज्ज ठेविला आहे.

रावण:- शाब्बास सेनापती शाब्बास, बसावे.

याप्रमाणे संभाषण झाल्यावर राम-लक्ष्मण यांच्याशी रावणाचे बोलणे होते. नंतर एकेकाशी लढाई होऊन सर्व सैन्य मारले जाते. शेवटी रावणाशी लढाई होऊन रावणही मारला जातो. अशा प्रकारे हा भाग दाखविला जातो.

## (२५) हिडिंबा

हे भयानक आक्राळ विक्राळ असे सोंग निघते. नाचणारा व लढाई देणारा माणूस दणकट दमदार असावा लागतो. लढाई देताना राम-लक्ष्मणास फार सांभाळावे लागते. कारण हिडींबाराक्षसीणीच्या हातात पेटलेले टेंभे असतात.जोरदार लढाई होऊन हिडिंबा पळून जाते (भावाकडे).

**(२६) वेताळ:** या सोंगाला टोप म्हणतात लोखंडी पट्ट्याचा ग्लास बसतील असा २/३ मजली डेरेदार व कळस असलेले हे सोंग २५/३० मेणबत्त्या पेटवून डोक्यात घालून नाचवतात. ढाल-तलवार घेतलेला दक्षी राजा लढाईला पाठवितात.

जुन्या बोहाड्यांत भगत व वेताळाच्या भुताळ्या काढून अंधश्रध्दा दाखविली जात असे.

**(२७) नरसिंह अवतार व हिरण्याकश्यपू**

भक्त प्रल्हाद हे सोंग जुन्या बोहोड्यात स्टेजवर संवादात्मक पध्दतींने दाखविले जाई.

नरसिंह प्रल्हाद व त्याची ईश्वरभक्तीची कसोटी शेवटी केळीच्या खांबातुन नरसिंह प्रगट होऊन हिरण्याकश्यपूचे नखानी पोट फाडतो. शेवटी लढाई होते. हे सोंग सूर्योदयाच्या आत काढतात. हल्लीच्या बोहोड्यात हिरण्याकश्यपू व नरसिंह काढतात.

(२८) चंद्र-सूर्य ही दोन मुखवटे घेतलेली सोंगे फक्त मिरवितात.

(२९) कासव-हे अलिकडे नवीन सोंग काढतात.

(३०) अग्नीदेव (३१) वाघ (३२) घोडा (३३) होडी (३४) माकड (३५) तारु स्त्री स्वरुप जगदंबा अंबा बाई मुख्य सोंग देवीचे मुख्य सोंग मंगळवार अगर शुक्रवारी निघेल या योजनेने या उत्सवाची योजना करतात.

श्री खंडेराव महाराजांच्या सोंगाप्रमाणे हे सोंग भावनात्मक व पावित्र्य राखून काढले जाते. या देवीच्या लढाईला लोंढ्या व मुख्य सोंग महिषासुर येतो. महिषासुराचा वध झाल्यावर मंडपात पूजा अर्चा आरती - नारळ फोडून देवी प्रमुख घरोघर मिरवीतात गावात देवीचे देऊळ किंवा गावदेवीचे ठाणक (स्थान) असल्यास तेथे देवीला नेतात व नवस फेडतात. देवीला बकऱ्याचा बळी देऊन गावाला प्रसाद वाटण्याची प्रथा आहे. या देवीच्या सोंगाला नाचविणाऱ्या व्यक्तीला नविन चोळी लुगडे, हिरवाचुडा, बकरा इ. बाबतीत फार खर्च करावा लागतो हे गावात मानाचे सोंग समजतात. या सोंगानंतर काही गावात दुपारी कुस्त्यांचा फड गाजवून योग्य बक्षीसे देतात.

शहरी व ग्रामीण भागांतील होणाऱ्या बोहोड्यांची तोंड ओळख:-

बोहोडा करण्याची मुदत नवस म्हणून ५ वर्षे मानतात, नंतर बंद करतात.

मात्र जव्हार या आदिवासी भागात संस्थान काळापासून ठराविक तिथीला व त्या महिन्यात बोहोडा (जगदंबेचा) उत्सव करण्याची प्रथा कायम आहे ती गावे:

**(१) भरसट्मेट आदिवासी गाव :**

वैशाख शु।।३ (अक्षय तृतीया) प्रसिध्द बोहोडा

**(२) गरदवाडी आदिवासी गाव:**

चैत्र शु।। पौर्णिमा हनुमान जयंती

**(३) करढण-कारटीपाडा आदिवासी भाग:**

हनुमान जयंती-प्रसिध्द व अलिकडे पध्दतशीर होणारा बोहाडा.

**(४) ठाणे जि. ता. शहापुर खर्डी शहरी गाव:**

देवीचे स्थान प्रसिध्द असुन अक्षयतृतीया जुन्याकाळापासुन जागृतस्थान व नवसाचे ठिकाण.

### (५) मोखाडा तालुका शहरी व ग्रामीण ठिकाण:

देवीचे मंदिर असून पूर्वी पासून रंगपंचमीस हिंडिंबाचे लग्न सुरुवात होऊन ६,७,८ मीस देवीचे सोंग निघते त्याच दिवशी कुस्त्यांचा फड भरतो. नवसपाणी व देवीचे जागृत स्थान मानून हा उत्सव पूर्वी पासून संपादणी व नाट्यमय पध्दतीने होत असतो. हल्ली ग्रामीण भागातील जव्हार तालुक्यात हौस म्हणून काही प्रमुख गावी व पाड्यावर सोंगाचासंच भाड्याने नेऊन विशेषत: चैत्र वैशाखात बोहाडे करण्याची चाल सुरु झाली आहे.

एक जुनी धार्मिक व गावाच्या सुखाच्या दृष्टीने गावाच्या देवीचा उत्सव समजून एक प्रकारे आपल्या संस्कृतीचे रक्षण करण्याची पध्दत आहे.असे समजतात.

या उत्सवासंबंधी थोडे विवेचनात्मक भाग म्हणजे बोहाडा अमक्या गावाचा आहे, हे जाहीर झाल्यावर आजुबाजूच्या गावचे लोक स्त्री-पुरुष, तरुण-तरुणी मुले-बाळे बोहाडा पाहण्यास येत असतात व तशीच काही हलवाई, छोटे चहावाले, खाऊवाले, फुगेवाले लोक येत असतात. त्यात फुटाणे व पाणपट्टी वालेही दुकानदार असतात. एक दोन दिवस तेही लोक फायदा करुन घेतात. तसेच बोहोडयाच्या नावाप्रमाणे काही हौसे-नवसे लोक व्यसनाधीन होऊन गोंधळ माजविताना दिसतात. ही बाब थोडी खटकते, मात्र पण अलिकडे गावचे सरपंच, पो. पाटील व तरुण मंडळ चांगली व्यवस्था ठेवण्याचा प्रयत्न करतात हेही विशेष होय.

या उत्सवात वाद्य वाजविणारे ताफे दोन असतात. त्यात दोन संबळ वाजविणारे, दोन कांडे (कहाळी) वाजविणारे एक एक सूर वाजविणारा असतो. ही वाजंत्री मंडळी मूळची तरबेज असते. त्यांच्या वाजविण्याच्या कौशल्याने सोंग आपले ठेक्यात व तालात नाचत असते.

वाजंत्री वाजताच सोंग घेणाऱ्याच्या अंगात विरश्री उत्पन्न होऊन तो पावलाच्या व संबळाच्या ठेक्यात नाचत असतो. बघणारालाही चेव चढत असतो. संस्थानच्या आमदानीत जव्हारच्या राजानी खास माणसे बोहड्याच्या नाचकामाचे शिक्षण घेण्यासाठी नासिक गंगापूर-देशावर पाठवून ती कला शिकून आणल्याचे समजते. अलिकडे ग्रामीण भागात एका गावात दोन दोन उत्सव होतात. गांव मोठा असल्याने एक खालच्या आळीचा तर दुसरा वरच्या आळीचा चढाओढीने खेळ होतो.

स्मरणांत कायम राहिलेले पाहिलेले सोंग

वेताळ व त्याची भुतावळ

हे सोंग चावडी जवळील छबीलदासचा बोहडा

हे सोंग साधारण सूर्योदयाच्या वेळी

निघते- सोंगाबरोबर वेताळाच्या भुताळ्या हातात बाडग्या

त्यात विस्तव, पेटता भयानक ड्रेस

किंचाळणे - धावणे

भगत-कोंबडा तोरठ

(पृष्ठ ४७ वर पहा)

व्यक्तिचित्र

# देऊ बाबा

**कै. ग. ये. मुकणे (गुरुजी)**
राजगुरु, जव्हार संस्थान

'देऊ बाबा' एक आदिवासी समाजातील सुमारे ५०-५५ वयाची व्यक्ती. निरक्षर पण व्यवहारात चोख. श्रमजीवी उत्तम शेतकरी आणि कर्तव्यनिष्ठ कर्मचारी आहे. माझा शिक्षकी पेशा असल्याने जव्हार तालुक्यातील ग्रामीण भागात संस्थानी अंमलात सन १९३३ पासून सन १९७० अखेर पर्यंतची नोकरी आदिवासी विभागात झाल्या कारणाने व आदिवासी जमातींच्या भाषा, रीतीरिवाज, देवधर्म, खाणेपिणे, वागणे, स्वभावविशेष यांचा अभ्यास करण्याची आवड मुळापासून असल्याने 'बाबा' ही व्यक्ती निवडून माझे विचार या लेखात अनुभवसिध्द असे मांडण्याचा माझा प्रयत्न आहे.

प्रस्तुत कथेतील 'देऊ बाबा' याचा व माझा परिचय कसा झाला ? याची मीमांसा करणे जरुर वाटते. मी जव्हार येथे कृष्ण विद्यालयात इयत्ता ७ वी च्या वर्गावर शिक्षक व त्याबरोबर विक्रम हा वसतिगृहाचा व्यवस्थापक म्हणून काम पहात होतो. योगायोगाने देऊ बाबाचा वडील मुलगा खेड्याच्या प्राथ. शाळेत इ. ४ थी पास होऊन इ. ५ वी करिता वसतिगृहात प्रवेश मिळवून जव्हारच्या शाळेत आला. दोन वर्षे मराठी ७ वी पर्यंत अभ्यास केला. पण शेवटी प्राथ. शालांत परीक्षेत नापास झाल्याने घरी गेला. मधून मधून देऊ बाबा जव्हारला आल्यावर भेटून पोऱ्याला नोकरी मिळणे कामी खटपटीत असे.

एक दिवस दिला अर्ज लिहूनि मुलाखत ही झाली. पोऱ्याला चांगले ठिकाणी पट्टेवाले शिपायाची नोकरी मिळाली. देऊ बाबाला फार बरे वाटले. बाबाला दोन मुलगे व मुलीही आहेत. धाकटा मुलगा वडिलांप्रमाणेच कष्टाळू व उत्तम शेतकरी असून अशिक्षित आहे. या धाकट्या मुलावर बाबांचा फार जीव आहे असे दिसते. आपला मुलगा शिकला नाही तरीपण त्याने उत्तम कामधंदा करुन घरदार सांभाळून एक आदर्श शेतकरी व्हावा अशी शिकवण बाबा त्याला देत आहे.

अलिकडे पाच सहा वर्षांत बाबाला शिक्षणाचे महत्त्व पटल्याने आपल्या नातवांना शाळेत पाठवून आश्रमशाळेचा लाभ घेऊन तो मुला-बाळांच्या शिक्षणासाठी ऐपती प्रमाणे खर्च करीत आहे.

आमचा आदिवासी देऊ बाबा जव्हारपासून ५/६ मैलांवर जंगल भागात एका लहान अशा खेडेगांवी राहतो. मूळ गावात वडिलार्जित मध्यमसे घर असून मालकीच्या शेतावर एक छानसे घर बांधून राहत आहे. या शेतावरील वसतिस्थानांत गुरेढोरे, बकऱ्या, कोंबड्या, शेतीची आवजारे ठेवण्याची उत्तम व्यवस्था केली आहे, असे दिसून येते. एक आदिवासी खरा पण सुखी प्राणी, जंगलमे मंगल या भावनेने सुखसमृध्दी साठी अहोरात्र धडपड करताना दिसतो.

मुळातच देऊ बाबाची राहणी साधी. अंगात कोपरी, डोक्याला पंचा, लंगोटी नाही तर चड्डी. मात्र जव्हारास येताना उत्तम बंडी, हाफपँड, केसवाढलेले - बुचडा बांधण्याजोगे. पण डोक्याला पंचबांधून व्यवस्थित पोशाख, दारुपाणी न घेणारा साध्या राहणीचा व उच्च विचाराचा माणूस मी समजतो.

पण देऊ बाबा जुन्या विचाराची, भ्रामक कल्पना मानणारी व्यक्ति आहे. स्वभाव प्रेमळ, निर्भीड, समयानुरुप जशास तसा वागणारा, विश्वासू आज्ञाधारक असे गुण परिचयाने थोड्याफार फरकाने मला दिसून येतात. सून-मुलगा व स्वत:चे मार्गदर्शन व एकमेकांचे हितकारक विचार यांचा मेळ असल्याशिवाय घर चालणार नाही असे त्याला वाटते. शहरी भागात दुकानदारांशी त्याची चांगली पत आहे. विशेष म्हणजे देऊ बाबा आज शेतकरी म्हणून शेतीकडे लक्ष देऊन नोकर म्हणून एका सरकारी कार्यालयात रात्रीचा रखवालदार म्हणून कामाला असतो. संध्याकाळी ५.३० ते सकाळी ८,९ वाजेपर्यंत नेमलेल्या कामगिरीवर असतो. मागे मैलबिगारी होता.

वय झाल्या कारणाने जवळ-जवळ रोजंदारीवर हजेरी प्रमाणे पगार मिळवितो. कामाच्या मानाने पगाराबाबत त्याची तक्रार नाही फारच समाधानी आहे. काटकसरी असून दोन पैसे पदरी बाळगून असणारा वाटतो. अशिक्षित असूनही इमानदार नोकर म्हणून त्याची कामाची पध्दत व आज्ञाधारकपणा याबद्दल एक एक किस्सा माझ्या जवळ सांगतो. त्याचे व माझे विचार काही अंशी जमतात असे मानून तो माझ्याशी मधुन मधून भेट घेऊन मनमोकळी चर्चा करुन बोलतो आणि मीही अभ्यासूवृत्तीने त्याचे विचार टिपतो. संग्रही ठेवतो. मला तर ही व्यक्ती घरोब्याची मित्रासमान वाटते. मात्र त्याच्या सर्व विचारांशी मी पूर्ण सहमत आहे असे कृपया समजू नये.

प्रिय वाचक मित्रांनो, काही प्रासंगिक आमच्या विचारांचे किस्से देऊ बाबांच्या भाषेत मांडणार आहे. मला तर मोठी गंमत वाटते. कोणतीही गोष्ट अगर विषय सांगताना हावभावयुक्त जणू काय नाट्यीकरण करुन आडपडदा न ठेवता खरे तेच मनापासून सांगतो.

मी एक दिवस सहज विचारले देऊ बाबा तुझे रात्रीचे काम राखणदार म्हणून तू करतोस, आणखी हापिसची कोणती कामे करतोस ? तो म्हणतो - ''मास्तरबाबा मालं एकच काम रातपाळीचा हापिसात नाय - सकाळीचे येळी हापिस झाडून झटकून टेबल, खुर्च्या पुसायच्या, पाण्याचा भांडा साफ करुन नवीन पानी भरायचा, समद्याना पिया लागतना ? तोट्यात एखाद दिवशी अरजंट टपालाचा काम निघतं, सायब, भाऊसायब रातचे दहा बारा वाजतांच लिहीत बसतात, मग आपन काय निजायचा ? गोठ नको. भाऊसायबाचा हुकूम... चिहा बनव, मग २-४ कोप चिहा करायचा पियाचा, काम चालू. सायबाबरोबर मला बी चिहा मजान् काय ? मी मध्येच कामात राम भारी मजा !''

दुसरा किस्सा ... तू अडाणी तुला कामाचे कागद कसे समजतात ? ''मालं काय सगळी कागदा सायबापदेन सया घियाच्या तशीच घेन लखोट्यांत भराया आमचे भाऊसायबापा दियाची. आम्ही अडाणू 'डोळ असून आंदळ' काय करतोस. आमचा शिकायचा हंगाम गेला. ऐक हो भाऊसायबानी एके चिठ्ठीवन लिहून दिला ... ला पक्काकूट मी गेलू चिठी घेन मला का वाचता येते ''जीवा माल कुटतील. आपला मराण आपले हाती.''

दुसरी गोठ ऐक हो - एक दी हापिसात रातीचा खूप काम निघाला. तहा मी, भाऊसायब, मोठंसायब

व्हतू. मी बसेल माझी रातपाळी पटेवाला शिपाय नव्हता. कागद अरजंट सयांच कातस टेबलावर सायबानी माल हाक दिली... मी बोललू काय ? अरे तो शिक्का आण मी त चापादलूं कनचा सिका नेव बरं ? मग काय सिक्यांचा खोकाच सायबाप नेन दिला. सायब घे तुला पाहजे तो सिक्का, मालं का वाचता येतंय ? पन सरकारी काम अडवणूक नको. लगेच त्यांनी मला पटविण्यासाठी हसत हसत उदाहरण देऊन पटविले की; ''मास्तर बाबा होय मारवतीनी मोठा डोंगरच उचलून नेला का तर आपले लक्षीमनाल दवा पाहजे हुती तशी आपली गत.'' मी म्हणालो, श्रीलक्ष्मणाला शक्ती लागून तो मूर्च्छित पडला तेव्हा मारुतीरायांनी द्रोणागिरी पर्वतच उचलून आणला तसेच तू केले अन् मारवती सांगाया बिलगला घीजा तुम्हांल पहाज ती वनसय ! तसाच मी केलान् काय गंमत सांगू ! त्याचे हे बोलणे व तंतोतंत उदाहरण देऊन पटवून देण्याचे कौशल्य कौतुकास्पद व मोठ्या गमतीचे वाटते.

अडाणी आदिवासी माणूस रामायणातील कथा सांगतो, हे आश्चर्य नाही का ? देऊ बाबाच्या अंगी निर्भयपणा हा मोठा गुण नजरेस येतो. निर्भयपणाचा किस्सा सांगताना म्हणतो कसा - काळेराती बाराचे एळी मालं मनसुटीत एकट्याला जायाला सांगा, मी भिनार नाय. जाईनच आपन भियाचा नाय. भिलो तर आपन मेलो. समजा खलास झालो.

निर्भयपणाबद्दल लोकभ्रम, जुन्या समजुतीने म्हणतो की; रातीचे दिसाचे वेळी कोठ जाता येता जंगल असो, भूत खेत, मुंजा खैरा असो, ओढाच काय वाघ भेटला तर सांगीन ज्याचे-त्याला पोट आहे. तुझे तू रसत्याल जायजोस, माझे मी जाईन. ज्याचे तेचे जिवाल जो तो भियतोच ना काय ?

देऊ बाबा खेड्यात राहणारा जुन्या तसाच नव्या वळणाचा असल्याकारणाने आदिवासींच्या जुन्या चालीरीती, देवधर्म, गावदेव, बाया, भुतखेत यावर विश्वास ठेवणारा, भगतीगिरी करुन भाविक भोळा वाटतो. भाव तसा देव समजून देवाला नवसपाणी करुन नारळ फोडून काडी लावून विनंती केली की देव पिडा दूर करतो ही पक्की समजूत झालेली असा माणूस आहे.

गावचे देव कार्यांत आघाडीवर असणारा वाटतो. खेड्यावर त्याला मानतात असे दिसते. घरची स्थिती बरी असल्याने अडल्या नडल्यांना गरीबांना वेळीच मदत करण्याचा गुण आहे. दारु पिणाऱ्या माणसांची त्याला फारच चीड येते. भ्रामक कल्पनेने देवाला दारुची धार पाडतो पण स्वत: दारु पीत नाही. त्याच्याकडे दारु पिऊन माजून आलेल्या माणसाला दारुचे दुष्परिणाम पटवून देऊन त्याची खरडपट्टी काढून त्याच्याशी संबंध ठेवीत नसतो. एखादा माणून चांगले कपडे घालून हाताला घड्याळ बांधून दारुड्या भेटला व बडबड करुन त्रास देऊ लागला तर बोलतो कसा ? अरे रावनासारख्या मोठ मोठ्या गोठी करतोस काशाल चांगल बेस कपडं घालून, हाताल घडेल बांधून पोठवाय दावतोस ? घरात ताव अनाचा कण नाय. पोराबाळांना उपासी ठेवून लबाड चाळ करतोस ? आम्ही तुमचे परीसबेस (हावभाव भावकरुन) ही माझी लंगोटी आहे पन हिल अब्रू आहे, तुम्ही लोक सिकेल सवरेल पन तुम्हाला अकल काडीची नाय फार कमी.

एखादे दिवशी सहज विचार मांडताना बाबा तळमळीने अंतरीचे बोल माझ्याजवळ काढतो व मला आश्चर्य वाटते की या खेडवळ अडाणी पण माझ्या दृष्टीने एका सुज्ञ शिक्षित माणसाचे तळमळीने मांडलेले थोर विचार वाटतात व माझ्या विचारांना चालना मिळते. विषय धार्मिक पण त्याचे जुने विचार पहा -

"मास्तरबाबा तुलं माझे बोलाने वाईट वाटल नाय? अरे दोन वर्सी होन गेली कोठ मारवती मंदीर बांधुन पुरा झाला नाय ? जवारीत काय दाखवाया ठवलाय ? तुम्ही जमवा पैसा माझे गरीबाकडुनही घिजा पाचक रुपये. तुम्ही मोठं लोक काय करता. तुम्ही मातर दारु पिता आम्हाला सांगता दारु पिऊ नका अशानं कोठ जमतंय ? जुने काळी पांढरपेसे आपल्याल दूर ठवीत. वेव्हती हे राजात लोक शिकल शहान झाल. सबलोक एक, कोठ शिवाशिव नाय आपन सगळी मानसा एक जिवाभावाची जुज्ञा माझा इचार जमतोय तहां मी तुल हे सांगतूय. मी त पोऱ्याला सांगतोय पोऱ्या आपले कामावर आलेली सगळी मानसा एक जिवाची तहा जेवनात भेद नको. साऱ्यांना सारखी मीठ-भाकर-भाजी दे. आपन खाव ते सारेना वाढजा. तेचे समोर तुम्ही जेवा यात मानुसकी आहे.

पोटाला भरपूर द्यावा मग कुलंब्यानी काम घ्यावा. जगाची रीत आहे. खोटेपना माल नाही आवडत. खरातेच बोलावा. सहारातले लोकांनी माड्या बांधल्या. आपन लोक भिकारी रहूलं. का तर अंगात कष्ट नाही. पैसा कमवायची अकल नाय-हुनर नाय. देवानी धरितरी माता दिली तिची मेहनत करा. कसून शेती करा. ती माता धन-धान देईल तिला माना. देव धर्माला इसरु नका हे बाबाचे बोल बहुमोल वाटतात.

जुन्या आठवणी सांगताना विषयानुरुप पटविण्याची त्यांची लकब फारच तळमळीची वाटते. जव्हारचा बोहोडा फार बेस होता तो कोठं गेला. पन आता शिलांगण बेस काढता होरे. पन खंडेरायाची जत्रा मिरवीत नाय. भरत नाय. काशा रे ? जव्हारचा सुपलीओढा मोठा सोन्याचा खंडेराय कोठं गेला ? वांगसट, बकरसट ती पाळणूक कोठ गेली ?" अशा प्रकारची खंत तो व्यक्त करतो.

"वागणूक व नात्यागोताचे संबंध यात मुलापेक्षा मला फार मानतो. आठवण म्हणून त्याचे बोल मालं मुलगी आवडते होरे. मुलापशी मुलीचा जीव भारी आपस्यावर. मुलगी पटकन् ५/१० रुपये हातात घालते व म्हनते बा ठव हे तुल खर्चाया. तू सांगेल मुलीची गोठ माझे मनात जिवात मी ठेवलेय. आपन सतीज वागाचा पाइज. परवा मालं आठवन आली मास्तर बाबानी सांगेल गोठ खरीच. मुलापक्षी मुलगी भारी बेस."

कर्मचारी या दृष्टीने त्याची वागणूक मोठ्या अधिकाऱ्याबद्दल मला विचार प्रवर्तक वाटते. "मापा टपालाचे कागत भाऊसायब देतो नी मोठे सायबाची सय घिया पाठवतो. तहा मी ८,९ वाजता जेवणाचे टायमाला रातीचे सायबाकड जातो. सायब घरात दाराला कुलूपतनाय, दार ताव बंद. मी दारपा जाऊन दार वाजवतो व हाक मारतो सायब ए सायब" आतूनच कोण रेतू मी ... लगेच दार उघडून सायब इच्यारतो तू काय काम आणलास ? तहा मी सांगतू सायब, भाऊसायबानी होय कागदावर सया मागितल्यात उद्याल सकाळीच मोठे हापिसला कागद घेन जायाचा आहे. तहा लगेच सायब कागद वाचून पहातो नि हसतच कागदावर सया करुन मापा कागद देतो. मी काय सायबाल घाबरन ? काय आपले घरचा काम आहे ? सरकारी काम चोख व्हायला पहाजे. ही भाऊसायबा मोठे सायबाल भित्यांत. मी सया घेत उलट सायबाकडचा चिहा पिऊन येतो.

❒ ❒ ❒

**कथा**

# गंगूचा खवीस मैतर

भावेश लक्ष्मण भोये
बेरिस्ते, मोखाडा

''अहंऽऽ, अँहऽऽ हास्ऽ हास्ऽऽ, उंई ऽऽ!'' गंगू घुमत होती. जोर एकवटून उठण्याचा प्रयत्न करीत होती. ''हस् हास्, आयय !'' सोडा, सोडा मास्नी. तो पहा बोलवितोया ! समोर, एकदा डावीकडे, एकदा उजवीकडे मान फेकत होती. केस मोकळे सुटले होते. चेहरा आक्रसून, दात कराकरा वाजवत हातवारे करत घुमताना बडबडत होती. हाताच्या मुठी डोक्यावर घेत शरीराला हिंदकाळे देत होती. उठण्याचा प्रयत्न करीत होती. मध्येच उघड्या दाराकडे एकटक पहात घुमण्याचा भर ओसरला की, हुडहुडी भरल्यासारखी, ''हूँऽऽ, उँहूऽऽ'' अंग कापवित पुन्हा आसूड पाडत होती, ''हास्, हास् आई ग !'' एका बाजूला देवरामने तिच्या नवऱ्याने पकडून ठेवले होते. तर दुसऱ्या बाजूने तिच्या भावाने. तरीही दोघांना आवरत नव्हती. ओसरीत बघ्यांची गर्दी झालेली. लहानपोरं भीतीने आयांना बिलगलेली. मोठ्या पोरांना गंमत वाटत होती.

''या पोरास्नी मजा वाटू राहायला व्हय ? चल पळा भायेर'' दारातून आत येणाऱ्या झिपर भगताला वाट करून देत देवजीने पोरांना बाहेर काढले. दरवाजा लोटून घेतला. अंधारात बाहेर काढलेली पोरं भीतीने आपापल्या घराकडे पळाली. गंगूच्या घुमण्याचा आवेश वाढल्यासारखा झाला. बाकी माणसं शांत झाली. झिपर भगताचा दराराच तसा होता. रापलेले हातभर लांब केस, चित्रातल्या राक्षसासारखा जाड भुवया. गालावरची दाढी केरसुणीसारखी पुढे टोकदार होत छातीपर्यंत आलेली. गळ्यात कवड्यांच्या अनेक माळा. दोन्ही मनगटात पंचरंगी धातुचे कडे, दंडाला चामडी वादी, डोळे कसे ते सागता येत नाही. ना काळे, ना घारे वा तपकिरी.

''हं, कवाड उघडं ठिवा. बाया माणसं, पोरास्नी जावा बरं घराकडं'' मोजकी दहाबारा मंडळी उरली. गंगूचं घुमशान चालू होतं, ''हास्ऽऽ हसूऽऽ उईऽऽ !'' ''घुमू द्या हौस आसल तेव्हढं, हं बोल देवराम कसं काय ?''

''काय की पण काका, सांच्याला एक येळच फाटी आणायला दोघपण रानात गेलो. फाटी फोडूस्तोवर उशीर झाला. पाण्याची बाटली घिवून ही हिरीवर पाणी आणायला गेली. हिरीवर कोन्ही न्हाय म्हणताना आतमंधी उतरुन पाणी घिवून आली. आली तशी लागण झाल्यागत. आयत्या फोडलेल्या फाट्या सुदीक आणता न्हाय आल्या तर ? एकट्याला कोण आवरतेय ? पार जीवावर घरापतू घिवून आलो''. देवराम एका दमात बोलता झाला.

''होयऽऽ हायऽऽ उंईऽऽ !''

''चूप रे !'' भगताने बटव्यातून पिसवीच्या टोकदार काड्यांचा, अंबाडीच्या दोरीत विणलेला

आसूड बाहेर काढला. गंगूच्या अंगातला खवीस क्षणभर गांगरला.

"माळरानावरुन हिरीवर जाताना ती मुंज्याच्या पिप्पळा खालून गेली आसंल, झिपरदा ?" देवरामच्या बापाने शंका काढली. "हां ! मग काय ? त्या पिप्पळावर तर त्याचा वास हायेच. त्यातून आज आवस. भर उन्हाचं, रातच्याला त्या पिप्पळा खालून कोन्ही आवस - पुनवेच तिकडून जात-येत न्हाय, ठाव नाही काय ?" पिंपळावरच्या खवीसाने धरलेल्या अनेकांना झिपर भगताने त्याच्या तावडीतून सोडवले होते.

"व्हय भावजी ! पण, तिला तरी बिच्चारीला काय ठाव ? लगीन होवून जेमतेम पंधरा दिस झालं असतील." देवरामची चुलती गंगूची बाजू घेत म्हणाली. बिच्चारी म्हटल्यावर खवीसाने जास्तच सतावायला सुरवात केली. "सोडा, सोडा अयाईऽऽ"

"झिपर ! आटोपून घे काय देणं-घणं आसलं तो. मग बसा रात भर चौकशा करीत." सकरु भगताने सूचना केली. हा झिपरचा गुरु. ऐंशीव्या वर्षी मान मी ! नाही मी ! नाही म्हणायला लागली. डोळ्यांचे पडदे अंधारले तेव्हा भगतगिरी सोडून दिली. त्यानेच झिपरला बोलावणे धाडले होते.

"आणा, मूठ आणा" देवरामच्या काकीने सुपात तांदूळ आणले. रुपयाचे नाणे ठेवले. झिपरने गंगूवरून मूठ उतारून घेतली.

"सामान आणलया का सारं ?" काशिरामने सिगारेट, नारळ, लिंबू, उदबत्ती, खाऊचा पुडा समोर ठेवला. झिपरने मांडी घातली. "सोडा मुंजा, करतो पुंजा, देतो खाणं, गुरूची आण?... !" सुपात तांदळाच्या पुंजक्या घालत तो मंत्र जपू लागला. मंत्राची सुरवात मोठ्याने करुन शेवटी आवाज कमी होत जावून तो तोंडातच पुटपुटत होता. अगरबत्तीचा मंद सुवास, घुमण्याचा आवाज आणि मंत्रोच्चार. बाकी सारे शांतपणे पहात होते.

"याद राख, या घडीला तुला महाग पडंल. कितीदा माफ केलंय. सोड म्हणतोय की, चालता हो" झिपर संतापला. दारातली कोल्हापुरी वहाण (ही वहाण त्याने खास खवीसासाठी बनवून घेतली होती.) हातात घेवून त्याने गंगूच्या अंगातल्या खवीसाला झोडपायला सुरवात केली.

"उंईऽऽ हास्ऽऽ आई गंऽऽ" खवीस कळवळला.

"अस्सा, बऱ्या बोलानं ठिकाणी ये नाय तर आसूड ओढीतो." आस्ते-आस्ते गंगू ढिली पडली. ग्लानी येवून ती बसल्या जागीच कलंडली. निरागस पोरावाणी डोळे मिटून घेतले. गंगूला खवीसाने सोडले तसा सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला विडी-तंबाखूला मोकळे झाले. "चहा ठिवू का ?" देवरामच्या काकीने विचारले. "राव्ह द्या, बोळवण करा पयले" सकरु म्हातारा. उताऱ्याच्या वस्तू पुन्हा एकदा गंगूवरून उतारून घेतल्या. चिमूटभर तांदूळ चिंधीच्या पुरचुंडीतून तिच्या दंडाला बांधले. दारातून उदी फुंकून दिली. तिच्या कपाळाला लावली. उताऱ्याच्या वस्तू सुपात घेवून गावाच्या वेशीपर्यंत खवीसाची यथासांग बोळवण केली.

अंगावरच्या हळदीचाही रंग गेला नाही. तो गंगूला खवीसाने धरले होते. पुन्हा असली आफत नको म्हणून देवराम तिला जीवापल्याड जपत होता. माळात गेल्यावर भर मध्यान्ही किंवा संध्याकाळच्या वेळेस त्या पिंपळाच्या आसपास फिरकू नकोस म्हणून आठवण करुन देत होता.

''काय बी होत न्हाय, एकदा लागला की, तो काय सतरांदा माझ्याच मागे लागणार व्हयं ?'' ती खवीसाला घाबरत नव्हती. ''व्हय गं ! पण काय सांगता येत न्हाय. एखादी बाई आवडली की, तो म्हणे हात धुवूनशान तिच्या पाठीशी लागतो. अन् या लोकांचा संचार पार बारा-बारा कोसापतूर आसतो म्हणे ! हरेकाची हद ठरवून दिल्याली आसते. गुंडांच्या हादी सारखी. आवडल्या माणसाला तो कुठबी, कवाबी धरत आसतो.'' लहानपणी ऐकलेल्या भूताखेतांच्या, वेताळखवीसांच्या गोष्टी ऐकवून देवराम तिला सावध करतो.

''तुला नेलं धरुन एखाद्या दिवशी म्हंजी मी बसलो की हात चोळत.''

''चला, कायतीच वंगाळ बोलू नगा. झिपर मामंजीस्नी सांगुन त्या खवीसाला खल्लासच करुन टाक म्हणावं !'' तो जणू पिंपळाच्या फांद्यांवर झोके घेत आहे. अशाप्रकारे गंगू तिकडे पहात म्हणते. ''हा तर ! मारुन टाक ही जात काय दिसत न्हाय कोणाला.'' ''तर, त्या दिशी मला कसा दिसला ? चांगला पांढऱ्याधोप कापडातला उंचच उंच !''

''काय म्हणतेस ? '' समोर गंगू नसून खवीस आहे असा देवराम भेदरला. ''चल, टळटळीत दुपार झाली.'' आजूबाजूच्या शेतात कोणी दिसत नाही. गाईगुरं सुध्दा गारव्याला गेली, तेव्हा देवराम लगबगीने उठत म्हणाला.

देवरामची आई आताच म्हणजे एक महिन्यापूर्वी वारली होती. आजारीच असायची अधून - मधून दोन वर्ष. ''माझा जीव आहे तो पतूर पोराचं लगीन उरकून घ्या. मी काय जगत न्हाय जास्त.'' लक्षण तशीच दिसत होती. घाईघाईतच साखरपुडा, लग्न उरकावं लागलं आणि पाचच दिवसांन तिने मान टाकली. घरातली सारी जबाबदारी गंगूवर येवून पडली. घराच्या दुसऱ्या भागात राहात असलेली देवरामची चुलती. तिला मार्गदर्शन करीत होती. तिच्या पोरी किरकोळ कामांत आनंदाने नव्या वहिनीला मदत करीत होत्या. गंगू लग्नाला तयार नव्हतीच. तिचे गावातील एका तरुणाबरोबर प्रेम प्रकरण होते. तो दुसऱ्या जातीतील असल्यामुळे आई-बापाचा प्रचंड विरोध होता. गंगूचा नाईलाज झाला. मन मारुन ती वरकरणी आनंदात दिवस ढकलीत होती. मनाशी काही निश्चय करुन ठामपणे पार पाडण्याचे ठरवून होती. महिना गेला.

''आज शीण आलाय शेतावर जायचा.'' देवरामची सकाळ आरामात चालली होती.

''चला, न्याहारी करुन घ्या. कालचा राब अपुरा राहलाय, गुरं गवत उसकटून टाकतील.''

''करु उद्याला.''

''आज काय झालं ?''

''काय न्हाय, जरा कसंनुसं होतयं.''

''करा आराम, मी जाऊन येत्ये घडीभर गुरं

हाकलून''

''नको, नको ! एकटीच्यान काय व्हनार ?''

''तर का ? मांडीवर घिवून बसू तुमास्नी ?''

''घरात मोप कामं पडलीत. ती उरकून घे आज. आबा ! जरा माळावर जावून गुरबिरं हाकलून या.'' अंगणात टोपली विणत बसलेल्या काशिरामला त्यानं सांगितलं.

आडवी-तिडवी कामं आटोपतानाच दिवस मावळला.

''कुठं जात्येस ?'' टमरेलात पाणी भरत असलेल्या गंगूला त्याने हटकले.

''परसाकडला''

''थांब, मी येतो सोबतीला''

''का ? लोक काय म्हणतील ? जरा ...!''

''मग कमळीला घे जोडीला. लांब जाव नगस.'' चुलतीची मुलगी बरोबर गेली. देवराम उंबरठ्यावर बसून राहिला. कमळी आली ती पळत, भयभीत होवून.

''दादा, दादा वयनी... !'' गंगू वारं घेत बडबडत येत होती. आज पुन्हा खवीस लागला होता. देवरामने शेतावर जायचे मुद्दाम टाळले होते. पण खवीस काय शेतावरच वाट पाहतोय ? त्याच्या हद्दीत तो कोठेही धरु शकतो.

''धाडायचं नव्हतं तिला शेतावर. आज आवस हाय ठावं न्हाय का ?'' बोलावणं पाठवलं तसा घाईघाईत जेवण उरकून झिपर भगत आला होता.

''शेतावर न्हाय मोठबा. ही, हिथं इरागतीला गेली होती. गुरांच्या दवाखान्या मागून.'' वैतागाव की, किव करावी देवरामला समजेना. तिला दोनचार लगावून खवीस थोडाच उतरणार होता ? भगताशिवाय पर्याय नव्हता. ''झिपर ! जरा ठोकून ठोक बघ बरं !'' डुगी-डुगी मान हलणाऱ्या सकरु आजाला त्याच्या नातवाने हाताला धरुन आत आणले. चाचपडत खाली बसत तो म्हणाला, मूठ, सूप, विळा, दिवा, उताऱ्याचे साहित्य घेवून झिपरुने मांडी घातंली. ''अगड मगड, नईची दगड... छू !'' गंगू घुमून घामेजली होती. ''हास्ऽऽ हास्ऽऽ उईऽऽ !'' खवीस हट्टाला पेटला होता, त्यातून झिपर चवताळला होता. ''मायला ! माज्यासारख्या भगतासंग गमजा करतोस व्हय ? खोड मोडून टाकीन.'' खवीसाने जेव्हा-जेव्हा कुणाला झपाटले तेव्हा झिपर म्हणाला होता. पण खवीस होता तिथंच होता आणि भगतही होता तोच होता. रात्रीचे बारा वाजले आणि खवीस झिपरला घाबरला असावा किंवा त्याचे समाधान झाले असावे. त्याने गंगूला सोडले. ती हळूहळू शांत झाली. मागच्या सारखी ग्लानी येवून पोटाशी पाय दुमडून तिथेच झोपी गेली.

''कोण म्हणेल रात्री गंगूला खवीस लागला होता ?'' सकाळी टवटवीत गंगू विहिरीवर पाण्याला गेली. सिनिअर, ज्युनिअर सगळ्याच बाया चकीतपणे तिच्याकडे पहात नेत्रपल्लवी करीत होत्या. तिच्या कानावर जाणार नाही अशा फुसफुसत होत्या. न राहवून एका म्हातारीने विचारलेच. ''गंगे ! बये एवढी मरणातून वाचतेस तरी कशी गं बाई तू बिनघोर ?''

''आत्या ! त्यो न्यायचा तेव्हा नेईल. आपण कशापाई घोर लावून घ्याचा ?'' 'त्यो' म्हणजे ती

देवाला उद्देशून म्हणते की खवीसाला बायांना उलगडा होईना. तरुणपोरी तर या बिनधास्तपणाने अधिकच चकीत झाल्या.

"पण.... काय ग आई-बापाकडं व्हतीस तिकडं सुदीक... !" "न्हाय आत्या, तिकडं कधी चुकून वारा बी लागला न्हाय." "सांबाळून ऱ्हा बाई" "त्यातून नव्या नवरीस्नी रानच्याचा जास्त शोष आसतो म्हणत्यात." पोक्त बाया सल्ला देतात.

निशाचर जातीचं कामच असतं हे. मानव जातीला त्रास नाही दिला तर ती भूत-खवीसांची जातच कसली. त्यांच्यातही अनेक जाती जमाती आहेत. भूत, हाडळ, डाकीण, लावसट यांच कार्यक्षेत्र वेगळं. राहण्याची ठिकाण वेगळी. मसणवटी, निबिड जाळकटी, खोल डोह, पडकी ओसाड घरं अशी. त्यातही रानभूत आणि गावभूत अशा पोटजाती आहेत. भूताळा-भूताळी असा भिन्नलिंगीय भेदाभेद आहेच. लग्न होतात की नाही कोणास ठाऊक ? रानभूत प्रामुख्याने रानात राहातात. कमी उपद्रवी असतात. मात्र गावभूत प्रसंगी जीवही घेतात. दिवसा उजेडी माणूस राहून माणसांत वावरणारी ही भूत रात्रपाळीत कामे करतात. भूविद्या सुध्दा रात्रीच शिकायची असते. त्यासाठी अमावस्येची रात्र योग्य समजली जाते. नागपंचमी, पिठोरी अमावस्या, सर्वपित्री अमावस्या हे मुहूर्त तर खूपच सोयीचे असतात. डिप्लोमा पूर्ण झाल्यावर गुरुला नरबळी, पशुबळी इत्यादी स्वरुपात गुरुदक्षिणा देवून छळण्याचे, झपाटण्याचे सर्टिफिकेट मिळवले जाते. एखाद्या विद्यार्थी, विद्यार्थीनीने शिक्षण अर्धवट सोडले तर ते ना धड माणसे ना धड भूत, तृतीय पंथीयांसारखी अवस्था होवून ते पागल होतात. भूत आपल्या सोयीप्रमाणे कुत्रा, मांजर, साप इत्यादींची रुपे घेवून कार्यभाग साधतात. आपल्याशी वैर पत्कारलेल्या किंवा कोणा व्यक्तींची झालेली भरभराट पाहवत नाही. म्हणजे गांवभूत नानाप्रकारे त्यांना शिक्षा करतात. पोटात एखादी वस्तूच भर, गोठ्यातलं जनावर मार, सेहऱ्याच्या साह्याने धान्य पळव, संकटे मागे लावून दे अशा तऱ्हेने त्रास देतात. अवतार विद्रुप, हिडीस असतो. पाय उलटे असतात. लचके सहजपणे तोडता यावेत म्हणून दात सुळ्यासारखे असतात. चावून वगैरे खाण्याचा प्रकार नाही म्हणून दाढा नसतात. याउलट खवीस जातीचं असतं. यांचा मुक्काम विराट वड, पिंपळ, पडक्या विहिरीतून असतो. राहणी टापटिपीची, पांढरा रंग आवडता, सिंगारेट, पान-तंबाखू, खाऊचा पुडा इत्यादींचा उतारा ठेवतात. भुतांची जात मात्र मांसाहारी, कोंबडी, बोकडाशिवाय ते सोडायला तयार नसतात. त्यातही आवडी-निवडी असतात. कोणाला आरवता कोंबडा चालतो तर कोणाला फिरंगी कोंबडी, कोणाला काळी तलंग. वाटणाला नारळ, भोजनाला लिंबू हवे, दारुशिवाय मटणाला मजा नाही. दारु तर पाहिजेच पाहिजे. ऐपत पाहून ही मंडळी खंडणी वसूल करतात. गरीब रुग्णाकडून बोकडावर समाधान मानतात. भगत आणि यांच्यात सोटेलोटे असतात. म्हणे निम्मं तुला निम्मं मला अशी वाटणी करुन तडजोड करतात. गावभूत तर भगताला टरकूनच असतात. मनुष्यरुपातील ही भुते भगत ओळखून असतो. खवीस मात्र सहजासहजी हार मानत नाही. त्याची जातच तालेवार असते. गंगूला खवीस लागण्याच्या निमित्ताने गावात अशाप्रकारे गप्पांमधून चर्चा चालली होती.

झिपरसारखा नामवंत भगत रंजीस आला होता. भल्या-भल्या भुतांची, खवीसांची भंबेरी उडवणारा तो स्वत:च भांबावला होता. हा खवीस डॉन असावा, दाद द्यायला तयार नाही. हट्टालाच पेटला होता. जणू गेल्या पंचवीस वर्षात झिपरला आव्हान देणारा असा कोणी भेटला नव्हता. अशानं आपल्या भगतगिरी विषयी टिंगल - टवाळी होतेय असं वाटून तो खजील होत होता. तिसऱ्यावेळी त्याने ताईत भारुन गंगूच्या गळ्यात घातला.

''आता आलाच ठिकाणावर, पिप्पळावर हकलपट्टीच करतो त्याची.'' झिपर आत्मविश्वासाने म्हणाला होता. पण चवथ्यांदा गंगूच्या म्हणण्याप्रमाणे तावीताचे झाकण फाटकण उघडून आतील रक्षाच वाऱ्यावर उडून गेली होती आणि गंगूला झपाटले होते. झिपरने हात टेकले.

''सकरु काका, तूच बग कायतरी आता. मी हरलो बुवा.'' पाचव्यांदा त्याने आपल्या गुरुचे पाय धरले. मधल्या काळात त्याने इतरत्र यशस्वी तोडगे केले. हा खवीस मात्र त्याचा बाप निघाला. ''नाय आटोपत म्हणतूयास ? उद्याच्याला बगू या.'' दुसऱ्या संध्याकाळी घराच्या चारी कोपऱ्यांवर मंत्राने भारलेले खिळे ठोकून घर बांधणी केली. पक्का बंदोबस्त केला. भगती सोडलेल्या सकरु आजाने सारा अनुभव पणास लावला. कोणत्याही प्रकारची करणी, चेटूक लागण घरातील कोणाला होणार नाही याची खात्री दिली. दोन महिने लोटले तेव्हा सर्वांना हायसे वाटले. ''मायला ! फार गमजा करीत व्हता, गेला ना उडत !'' उभी हयात गेली होती. भूता-खेतांशी, खवीस-मुंजाशी, जंतर-मंतर खेळण्यात. दोन महिन्यांनी एका दुपारी रानातून येताना गंगू वारा घेतच आली तेव्हा झिपर, सकरु आजासह गाववालेही चक्रावले.

चक्रावले होते, गंगुचे सासरवाले आणि माहेरवालेही. देवराम सुरवातीला तिला एवढे जपत होता, जीव लावत होता. पण त्यालाही ती नकोशी झाली होती. सासरा तर फटकूनच राहात होता. बाहेरचे नामवंत भगत झाले, दर्गे झाले उपयोग नाही. महिना-दीड महिना माहेरी ठेवून पाहिली, तेथेही खवीस तिची पाठ सोडीना. गंगू त्याला भलतीच भावली होती. तो इतका निगरगट्ट, निर्लज्ज झाला होता की, आमावस्या-पुनवेचे नियम मोडून काळ-वेळ न बघता कुठेही, कधीही झपाटत होता. तात्पुरत्या उपायांनी सोडत होता. कायमचा काही सोडून जात नव्हता. नवरा सासरा वैतागतील नाही तर काय ? त्यांनी गंगूला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतला. न जाणे तिच्यापायी घरातल्या कोणावर संकट कोसळले तर ? माहेरच्यांना काळजी वाटू लागली. देवरामचे ना धड संसारात लक्ष लागत ना धड कामात. तिच्या कामाबाबत बोलण्या चालण्याबाबत तक्रार करायला जागा नव्हती. खवीसापायी घरात उदासपणा भरुन राहिला होता.

झिपरला हे आव्हान होतं. त्याने वेगळा उपाय करुन पाहिला. लग्नापूर्वी तिचे कोणाशी प्रेमसंबंध होते का ? आणि असा अविवाहित तरुण कोण मरण पावला आहे काय ? त्याने गुप्तपणे चौकशी केली. घडलेच असेल असे तर त्याचा अतृप्त आत्मा गंगूला छळत असावा आणि तिच्याशी अजूनही संबंध ठेवून असावा असा त्याचा तर्क होता. परंतु आजूबाजूच्या गावातून गेल्या वर्ष दीड वर्ष भरात कोणी अविवाहित तरुण मरण पावला नव्हता किंवा कोणी आत्महत्या

केली नव्हती. झिपरची भगती इथेच खुंटली, मती गुंग झाली.

झपाटलेली एक रात्र संपली की, गंगू टवटवीत होवून सकाळी कामाला तय्यार ! नुकत्याच उमललेल्या फुलासारखी. काही घडलेच नाही अशा थाटात तिचा वावर सुरु होई. ''ऐ ! भूत आलं रं पळा'' तिला पाहताच लहान पोरांची घाबरगुंडी उडे. गंगू मनात हसत राही. जुन्या-जाणत्या बायाबाप्यांना तिची कीव येई.

''तरणीताठी पोरं, काय बला लागलीया मागं देवास ठावं'' जवान पोरं खवीसाच्या ठिकाणी स्वत:ला पहात. तिच्या समवयस्क सासुरवाशिणी पूर्वीसारखी आपुलकीनी सलगीन तिच्याशी बोलत नाहीत. सहानुभुतीचे रुपांतर तिरस्कारीत भयामध्ये झालेलं. पुढे-मागे गंगू दिसली की, समोर जणू खवीस आहे असं भय नजरेत दाटत असे. ''चुकूनही त्या पिप्पळाकडेस फिरकू नगा'' अशा सूचना त्यांना घरातून मिळत होत्या.

''सुंदराबाई ! तितली कळशी ठू ग हंड्यावर'' गंगू विहिरीवर कोणास तरी म्हणते.

''घे बये कमरेवर. मी लई घाईत हाय'' तिला वाळीत टाकल्यासारख बाया लगालग निघून जातात.

''गेल्या उडत'' नाकाचा शेंडा उडवत गंगू पुटपुटते. खवीसाच्या आठवणीने क्षणभर बेचैन होते. तरीही वाटेला अगदी एकटी निर्भयपणे चालत राहते. गुणगुणत राहते, ''येऊ कशी तशी मी नांदायला...!''

एका मंगळवारी गांव पंचायत बसली. नावजलेला भगत आणून भूतखेतं, खवीस-मुंज्या या समस्त भुतावळीचा कायमचा बंदोबस्त करुन टाकायचा ठराव झाला. पाचवी झाली की, अर्भके मृत्यूमुखी पडत. ताज्यातवान्या माणसाला एखाद्या भुताने मुठ मारली की, चालता-बोलता खल्लास. कोणाची गायम्हैस दूध देत नाय तर कुणाचा नुकताच बडवलेला चार दाती खोंड तडका-फडकी मरुन जाई. गावाची संपूर्ण वेसच भूत, खवीसांना बंद करावयाची ठरले.

''वर्गणी जमा होईस्तोवर काही वेळ जाणार हाय मंडळी ! तो पतूर पिप्पळावरल्याचा बंदोबस्त कराया पायजेल'' देवरामच्या काकाने मुद्दा मांडला.

''काय करणार ? माझ्यापरीन मी सेवा केली. तो अजाबात मानत न्हाय तर'' झिपरच्या आतापर्यंतच्या नावलौकिकाला खवीसाने काळे फासले होते.

''बुडापासून पिप्पळच तोडून टाकला तर ?'' एका तरुण पोराने शहाणपण सुचवलं.

''तसा तो आधकच पिसाटल, हैदोस मांडलं'' एकाने संभाव्य अरिष्ट व्यक्त केलं...

''दुसरा उपाय न्हाय टाकावा थिर्डून'' गावकऱ्यांच एकमत झालं. ''कुठं न्हायच न्हा आता'' म्हणत तरुण पोरांनी ती विराटवृक्ष भुसपाट केला. खोडं, फांद्यांचे तुकडे केले. त्याला उठबस करायला जागा ठेवली नाय. आठ-दहा दिवस झाले असतील, नसतील तोच गंगूला लागण झाली.

''हासू उई ! सोडा.... त्यो आलाय... अय्याई गंऽऽ !'' ''च्या मारी कुठं न्हात असल त्यो ?''

"वाराच त्यो ! पिप्पळाच्या बुडावर सुदीक न्हात आसलं." चवताळलेल्या गंगूला खवीसाने चांगलेच हैराण केले. देवरामच्या कुटुंबाकडे एकच पर्याय राहिला होता. त्याच्या सासू-सासऱ्याला पंचांना बोलावणे पाठवून, गावातले पंच बसवून जड अंतःकरणाने गंगूला रीतसर सोडचिठ्ठी देण्यांत आली. कुठला कडवटपणा नाही की, कोणती तक्रार नाही.

माहेरी राहून पाच-सहा महिने झालेत. या पाचसहा महिन्यांत चुकूनही खवीस तिच्या वाटेला गेला नाहीय. गंगू मन लावून स्वयंपाक पाणी, शेतातली कामे करीत होती. एका पहाटे ती अचानक गायब झाली. खवीसाने आपला हट्ट सोडला नाही. गंगूला पळवून नेले त्याने. खवीस झपाटतो, लागण होते पण चक्क अपहरण म्हणजे... ? पंचक्रोशी हादरुन गेली. इकडे काळजीच्या ठिकाणी गंगूच्या आई-बापाला बदनामीच्या भीतीने घेरले. दोन दिवसांनी खवीसाच्या नावागावाचा थांगपता लागला. गावातला तरुण देखणा लाल्या चार दिवसापासून कपडालत्त्यासह गायब होता. गंगूच्या घरच्यांना पक्कं ठाऊक होतं ती लाल्याबरोबर पळून गेलीय. लग्नाआधीचं तिचं प्रेमपात्र होतं ते ! जात वेगळी म्हणून आईबापांनी लग्नाला विरोध केला. या प्रेमिकांनी काही पाऊल उचलण्याच्या आतच तिचा साखरपुडा, लग्न होवून गेलं. सामाजिक बदनामीच्या भीतीने ती अनिच्छेनेच देवरामची सौभाग्यवती म्हणून कुंकू लावू लागली. मात्र तिचे तन-मन तिने केव्हाच लाल्याला बहाल केले होते.

दुसरे लग्न केलेल्या देवरामचा संसार सुखात चालला. गंगू आता त्या गांवात राहत नाही म्हंटल्यावर पिंपळाच्या बुडावर मुक्काम ठोकून असलेल्या खवीसाने ती जागा कायमची सोडली आहे. तिकडून आता पोरीबाळींचा वावर निर्धोकपणे चाललेला आहे. झिपरच्या भगतीला उतरती कळा लागलीय. एका अल्लड पोरीने आपल्याला कसे "मामा" बनवले याची चीड आणि खंत त्याला लागून राहिलीय. आपल्याला खवीस होता आले असते तर गंगूला आपण कसेकसे छळले असते या मनोराज्यात तो गुंतून पडतोय. तिच्या या नाटकाची तारीफ करावी की, शिव्याशाप द्यावेत. हेच लोकांना कळेना. तीन वर्ष नाशिकला काढून गंगू खवीस मैतराबरोबर गावाला परतलीय. आई-बापांनी तिला माफ करुन टाकलंय. एका सामाजिक संस्थेकडून लावण्यात येणाऱ्या सामुदायिक विवाह समारंभातून त्यांचा कायदेशीर विवाह झाला. आंतरजातीय विवाह म्हणून समाजकल्याण खात्यामार्फत गंगू - लाल्याचा सत्कार पेपरला बातमी फोटो छापून आलीय. दोन चिमण्या पोरांना सांभाळीत खवीस मैतराबरोबर गंगूचा संसार छान फुलला आहे. गंगूच्या नावे बोटे मोडायची की, शुभेच्छा धाडायच्यात आपणच ठरवावे !

❐ ❐ ❐

# देव करतो ते आपल्या बऱ्यासाठी !

(आदिवासी भाषेत रुपांतरीत गोष्ट)

कै. ग. ये.मुकणे (गुरुजी)
राजगुरु, जव्हार संस्थान,

एक मोठे जहागिरीत एक मोठा राजा राज करीत होता. राजाचा आपले परजेवर भारी जीव होता. राजाचा राजपाट अगदी बेस चालला होता. राजा-रानी मोठे सुखात दिस काढत होती. देवाचे दयेने त्यांचे पोटी एक राजबिंडा पोशा व्हता. राजाचा पोशा दिसामासी वाढाया लागला तसा शिका-सवराला लागला भारी हुशार झाला ते राजाचे पदरी एक मोठा साधुबुवा आसऱ्याला होता तो साधुबुवा भारी हुशार होता, राजाला येळ वखताला फारबेस सला मसलत द्यायचा.

एकदां काय गमत झाली? राजाचे घोड पागतला एक अबलख वारु एका एकी आजारी होऊन मरुन गेला. तहा राजानी आपले गुरुलं विचारला कि काय साधुबाबा आमचे पागतला माझे भारी आवडीचा वारु एकाएकी मेला या बद्दल तुम्हाल कसा काय वाटला?

साधुबुवा राजापा चटकन बोलुन उठला राजा ''देव करतो ते आपल्या बऱ्यासाठी करतो.''

बरे ते गोठीचे वानी झाला त्या झाला दुसरी मजा ऐका हो!

भादव्याचा महना सरला, भादव्यात गनपती बुडलं दसऱ्याचा महना उगवला देव देवता घटी बसली मग काय दसरा-सिलांगन राजाचा तसाच गावाचा मोठा सन राजाचा सिळखाना उघडला तेथुन समदी नवी जुनी हत्यारा ढाली-तरवारी, दांडपटं जंबे सगळा लढाईचा सामान काढुन सारेबासनांची सापसुप करुन पुजा मांडायची तयारी तोढयात तेठ खेळत खेळत राजाचा पोशा आला ना काय मजा एक तरवार उचलुन फिरवाय बिलगला. तरवार फिरवता फिरवता चुकून डावेहाताची करंगळी कापुन तिचा तुकडा पडला ही बातमी राजाला समजली त्याल फार वाईट वाटला. सनासुदीला राजाने पोशाचे हाताची करंगळी कापली ही भुमका वाऱ्यासारखी सारे गावात पसरली राजावर एकामागुन एक दुखाचं डोंगर ज कोसळल. तहा लगेच हुजऱ्याला हुकूम देऊन साधुबुवाला राजदरबारात बलवुन घितला. ते येळला भरदरबारात साधुबुवाचा सला म्हणुन राजा इचारता झाला. साधुमहाराजा आमचे पोशाचे हाताची करंगळी कापली जाऊन तेल कायम ची खोड झाली यावर तुमचा काय होरा आहे तो कथन करा असा हुकूम आहे.

साधुबुवा लगेच उभा रहला सारे दरबारात नांगुन नमिसकार करुन बुवा मागचा पुढचा बरा-वाईट इच्यार न करता बोलला ''राजा देव करतो ते आपल्या बऱ्यासाठी.'' ओढा ऐकताच राजाला भारी राग आला ते रागाचे भरात राजा बोलाया बिलगला अरे होया

साधु येडावलाहोरे घोडा मेला तहा ना पोशाची करंगळी कापली तहाही होयाचा एकच घोशा देव करतो ते बऱ्यासाठी काही नाही होय साधुलं तुरंद हद्पार करा. मग काय राजा बोलं दळ हालं साधुबुवानी आपल्या कोथळ्या, बाडबिसतारा गुंडाळुन घेऊन हदपारीचे सिक्षेवर पाठवून देण्यात आला.

इकडं काय मजा झाली ऐका हो दाजी! राजाचे पुतरालं दुनयेची भवना पहाणेची हौस वाटली. लगेच तो आपले वाड्यातील राजा-रानीचे महालात जान थडकला आपले मनातील इचार राजा पा सांगला. बाबामहाराज माल दुनयेची भवना पाहायची आहे. तेठ जान्याची आदन्या मिळावी ओढीच हात जोडून इनंती आहे. राजानी रानीचा सला घेऊन तेल परवासाची परमानगी दिली शिवाय पाहज तोढी मदत गाडी घोडा देनेची यवस्था करवली. राजाचा पोशा मोठे आनंदात दुसरे देशांची भवना पहाण्या साठी निघाला घोड्यावर सवार झाला. मग काय हे गावाहून ते गावाचा परवास करीत करीत मुलुख पहात पहात बरेच दिसांनी दुसरे एका राजाचे राजधानीचे सहारात आला. तपासात तेठ एक गावातील धरमसाळ दिसली तेठ होयांनी मुकाम ठोकला.

बोला फुलाची गाठ काय कोन जानं ते येळी ते गावची वर्साची देवीची यातरा भरायची सुरवात होती ते राजाचे गावातील गावदेवीलं दर वर्साला नरबळी देन्याची वहीवाट जुनेकाळपासुन चालत होती. तहा राजाचे हुकमाने देवीचे भगते पुंजारी सगळे तयारीला लागले. मोठा काम म्हणजे नरबळी पाहज त्येचा सुगावा घेताघेता होयांना धरमसाळत उतरलेला उमदा पोशाचा सुगाना लागला मग काय देवीचे भगतांनी शिपायाचे मदतीचा आधार घेन होय पहान्याला पोशाला पकडुन राजाकड हजीर केला. राजाही खुस झाला तेनी मोठे कामाबद्दल भगतांना शाबासकी दिली.

दुसरे दिसी देवीला नरबळी देण्याची पुंजा पतरीची तयारी सुरु झाली. राजाचे समोर सगळा सामान दाखविण्यात आला. ते येळी होया नरबळी हजीर केला तेची सक्षी निक्षी तपासणी सुरु झाली पन काय चिमितकार झाला पहा होय पोशाचे डावे हाताची करंगळी तुटलेली दिसली. झाली पंचाईत निघाली खोड! खोडीचा नरबळी देवीला चालत नाय हा कायम रिवाज मोडावा कसा? कोणी? लगेच राजाचा हुकुम तेठच सुटला होय खोडीचे पोशाला मोठा पाहानचार करुन मानापानात सोडुन दिजास. मग काय अमलबजावनी होऊन होय पोशाला सहीसलामत सोडून दिला. म्हनच आहे एक अरे-देव तारी तेलं कोन मारी? पोशाला भारी आनंद झाला लगेच आपले मुळ राजधानीस परतीचे परवासाला लागुन सुखात घरी आला. आपला मुलगा सारे दुनियेची भवना पाहुन सुखात घरी परतला हे मुळ राजा-रानील मोठा आनंद झाला. जेवणा खावना आटपली तहा बोलता बोलता आपली करम कथा सांगाया बिलगला तेल पहली आठवन झाली. बाबा महाराजा आपले दरबारात साधुबुवा होता तो नेहमी तुम्हापा बोलायचा ''देव करतो ते आपले बऱ्यासाठी करतो,'' तेची परचिती मालं खरोखर आली. माझी करंगळी तुटली तहा तो

(पृष्ठ ३७ वर पहा)

# आदिवासींनी आत्मपरीक्षण करणे काळाची गरज!

**रवि लक्ष्मण बुधर**
जांभूळविहीर, (जव्हार)

संपूर्ण जगाला आज ज्या संस्कृतीची गरज आहे त्या संस्कृतीचे जतन करणारा व खऱ्या अर्थानं निखळ मानवतेची आठवण करुन देणारा घटक म्हणजे आदिवासी होय. श्रम, समूह, सहकार्य, प्रामाणिकपणा, भोळेपणा, त्यागवृत्ती आणि निसर्गाची उपासना जेथे अनुभवायला मिळते ती म्हणजे आदिवासी संस्कृती होय. हुंडा पध्दतीला थारा नसलेली व लग्न ठरविताना मुला-मुलीला पूर्ण स्वातंत्र्य असणारी अशी विवाहाची रीत, लग्न कमीत-कमी खर्चात करणे, दुर्दैवाने नवऱ्याचं निधन झाल्यावर स्त्रीला दुसरे लग्न करण्याचे स्वातंत्र्य, मूल-दूध पित असतानाच आईचे निधन झाल्यास त्याचवेळी जर नात्यातील एखादी बाळंतीण असेल तर तिने त्या बाळाला स्वत:च्या अंगावरचे दूध पाजणे, मुला प्रमाणेच मुलीलाही किंबहुना मुलापेक्षा जास्त महत्त्व देणे या व अशा अनेक विधायक बाबी आदिवासींमध्ये दिसून येतात. (अपवाद-अज्ञान, अंधश्रध्दा व बालविवाह) अलीकडेच शासनाच्या सर्वेक्षणानुसार सामान्य क्षेत्रात मुलींचे दर हजारी प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे. परंतु आदिवासी क्षेत्रात मात्र ते दर हजारी ९५० एवढे आहे.

भारत देशात एकूण ४२७ आदिवासी जमाती आहेत. त्यापैकी ४७ जमाती महाराष्ट्रात आहेत. आदिवासींच्या विकासासाठी घटनेतील कलम ३४२ मध्ये विशेष अशी तरतूद केलेली आहे. आरक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिल्यामुळे हजारो वर्षे अज्ञान व दारिद्र्याच्या गर्तेत वावरणारा आदिवासी शिक्षण घेऊ लागला. याच आरक्षण व शिक्षणाच्या जोरावर नोकरी आणि राजकारण या विकासाच्या प्रमुख क्षेत्रात प्रवेश करुन आपला विकास साधू लागला. हे आदिवासींना गौरवास्पद असले तरी आज ८५% आदिवासी समाज अज्ञान, दारिद्र्य व अंधश्रध्देच्या विळख्यातून बाहेर आलेला नाही. शोषण व वेठबिगारी ही आजही काही अंशी सुरुच आहे. अज्ञान व दारिद्र्य वगळता अंधश्रध्दा ही सुशिक्षित व नोकरवर्गामध्येही आढळते. ही फार मोठी चिंतेची बाब आहे. ज्ञान आणि विज्ञानाचा एवढा मोठा दीपस्तंभ असतानाही त्यांना कोणातरी बापू-महाराजांच्या कोलीताची नितांत आवश्यकता भासते. जो माणूस आपला इतिहास व संस्कृती विसरतो तो इतिहास कधीच घडवू शकत नाही. आपला इतिहास व संस्कृती एवढी महान असून त्याची ओळख आपल्या अडाणी बांधवांना यापूर्वी कुणी करुन दिली नाही, हे सर्वात मोठे दुर्दैव आहे. अशा इतिहास व संस्कृतीचा सुशिक्षितांनी अगोदर स्वत: अभ्यास करुन व त्यानंतर त्याची अज्ञानी लोकांना ओळख करुन दिली पाहिजे. सुशिक्षित तरुण

नोकरवर्ग आणि लोकप्रतिनिधी यांनी गोरगरिबांना त्यांचे हक्क व कर्तव्ये यांची जाणीव करुन दिली पाहिजे. हे करत असताना प्रथम त्यांनी स्वत: त्यानुसार आचरण करणे गरजेचे आहे. सुशिक्षित तरुणांनी वेळखाऊ क्रिकेट, जुगार, व्यसन, कुटील राजकारण यापासून दूर राहून निव्वळ नोकरीची वाट पाहात न बसता कोणतातरी लहान-मोठा उद्योग सुरु केला पाहिजे. तरुणींनी शिवणकामाचे प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग सुरु करुन अर्थार्जन केले पाहिजे. त्यासाठी स्वत:मध्ये असलेले कर्तृत्व व कसब पणाला लावले पाहिजे. नोकरवर्गांनी सुध्दा जातीचा व आरक्षणाचा फायदा घेऊन खूप शिकून उच्चपदस्थ गेलो, नोकरी करु लागलो आणि सामाजिक बांधिलकीच विसरलो असं जगणं सोडून समाज ऋण फेडण्याची तळमळ अंगी बाळगावी. कोणाच्याही भूलथापांना बळी न पडता सद्सद्विवेक जागृत ठेवून आपले कर्तव्य चोखपणे बजावले पाहिजे. व्यसनापासून तर दूरच रहावे. फारच राहवत नसेल तर किमान कर्तव्य बजावत असताना तरी मद्य प्राशन करु नये. आदिवासींमधून आदिवासींच्या उत्कर्षासाठी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी ज्यांच्या आशीर्वादाने कोणतं तरी पद मिळवलयं त्याचा खऱ्या अर्थाने गोर-गरीब व गरजू लोकांच्या सेवेसाठी उपयोग करावा. नाहीतर राजकारणाच्या नशेत वावरणाऱ्यांना सत्तेच्या सिंहासनावर बसून गरिबांच्या वेदनांऐवजी स्वत:चा उत्कर्षच महत्वाचा वाटतो, असे व्हायला नको. ज्या समाजाने मला सेवेची संधी दिली, त्या संधीचं सोनं करुन दाखविन, हेच ब्रीद बाळगले पाहिजे. त्यासाठी मतभेद विसरुन सर्वांनी मिळून ऐक्य ज्योतीने दारिद्र्याचा व वाम प्रवृत्तीचा अंधार दूर सारला पाहिजे.

आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी उत्थान कार्यक्रम (मास), बायफ, जलस्वराज्य, आर.सी अशा प्रकारच्या संस्थाही पुढे सरसावल्या आहेत. या स्वयंसेवी संस्थांमार्फत आदिवासींचा खऱ्या अर्थानं विकास व्हावा असेच प्रामाणिक प्रयत्न होत आहेत, अशी मला खात्री वाटते. अशा विकासात्मक संस्था की जिथे आदिवासींचे स्वायत्त असेल असे स्थापन करुन सुशिक्षित बेकार आदिवासी तरुणांनी स्वहित व दारिद्र्याचे जीवन जगणाऱ्यांचे हित साधावे. परंतु असे होण्याऐवजी आदिवासींतील अर्धवट शिकलेल्यांना व बेकारांना हाताशी धरुन काही संस्थांनी आदिवासींना संस्कार व शिक्षण देण्याच्या नावाने मूलतत्ववादी विचार पेरण्याचा चंगच बांधला आहे. अशा केंद्रांमार्फत तरुणांना तुटपुंजे मानधन दिले जाते. परंतु त्यांच्या अशा शिक्षण केंद्राचा आदिवासींच्या परिवर्तन व विकासात आजपर्यंत किती फायदा झाला आहे? हा सुध्दा एक संशोधनाचा विषय आहे. धुळे, नंदुरबार जिल्ह्यांत सर्वांत जास्त आदिवासी असून सुध्दा त्यांची गती, प्रगती व दिशा बऱ्याच अशी योग्य पध्दतीने होत असताना जाणवते. परंतु आमच्या मुंबईपासुन एका हाकेवर असलेल्या ठाणे जिल्ह्यात आदिवासींची अवस्था अतिशय दयनीय आहे. येथिल आदिवासींमध्ये नेतृत्व व विशिष्ट मार्गदर्शक विचारधारा यांचा अभाव असल्यामुळे संपूर्ण समाज दिशाहिन आहे. आमदार व खासदार हे आदिवासी असून सुध्दा त्यांनी केलेले प्रयत्न अपुरे ठरत आहे. विविध सामाजिक संघटना स्थापन होऊन त्यांच्याकडून समाजोध्दाराचे केविलवाणे प्रयत्न होत आहेत. काही समाजसेवक व लोकप्रतिनिधींना

गावातील लोकांच्या भानगडी पोलीस स्टेशनला जाऊन मिटविण्यात धन्यता मानून आपल्या जबाबदारीतील व्यापकतेचा विसर पडलेला आहे.

आदिवासी भागात गरीब-श्रीमंत अशी दरी वाढत आहे. शहरी आणि खेड्यांत राहणाऱ्या आदिवासींमध्ये सुसंवाद कमी होत आहे. सरकारी कचेऱ्यांमध्ये नोकरी करत असलेले आदिवासी कर्मचारीही गोर-गरीबांना सहकार्य करण्याऐवजी साहेबगिरी मिरवून उध्दटपणे वागतात. खेड्यातील बहुतांशी नोकरवर्ग शिक्षकेत्तर उद्योग, राजकारण, व्यसन व व्यसनावर उपाय म्हणून विविध अध्यात्मिक पंथ याबाबींना प्राधान्य देणारे आहेत. बहुतेक सक्षम व श्रीमंत आदिवासींना सामाजिक-बांधीलकीचा विसर पडलेला आहे. यामुळे आदिवासींच्या विकासाची धार बोथटली आहे. जीवन असताना साध्या-साध्या अडचणींवर मात कशी करायची हे ही बहुतांशी सुशिक्षित आदिवासींना जमत नाही. या अडचणींची उकल करण्यासाठी त्यांना कुणाच्यातरी कुबड्या घेण्याची जणू सवयच झालेली आहे. त्यासाठी प्रत्येकाने ही परावलंबित्वाची भावना सोडून स्वावलंबी बनले पाहिजे. त्याचबरोबर पोटजाती, राजकीय पक्ष, विविध अध्यात्मिक पंथ, गरीब-श्रीमंत अशा गटागटात विभागलेल्या आदिवासींनी प्रेम, सहकार्य, दातृत्व, शांती आणि प्रगतीच्या शिखराकडे नेणाऱ्या विचारांची कास धरावी. त्यासाठी गैर भावना सारे विसरुनी शांतीचा मार्ग अंगिकारु आणि स्वकर्तव्ये चोख बजावून या भारत भूमीला तारु.

❒ ❒ ❒

(पृष्ठ ३४ वरुन पुढे)

बोलला त्याचा फायदा झाला जर का मी बिनखोड ठरलो असतो तर मी देवीला बळी म्हणून जीवानशी गेलो असतो.

साधुबुवाची वाचा सतची होती होया मानुस मोठा जानकर होता तहा बाबामहाराज होय साधुचा सोध घेत तेला परत आनवा ही इनंती आहे.

परत राजाचा हुकूम ''राजाबोलं दळहालं'' साधुबुवा जेठ होवा तेठून सोध घेन लगेच तेलं आमचे दरबारात हाजीर करा.

शिपायाचं सवाराचं घोडं सुटल वाऱ्यासारख पळाया लागल सोधा सोध सुरुं झाली. बयादा लागला एके खेडेगावच्या जुनाठ देवळात साधुबुवा सापडला. राजाचा हुकूम सांगुन त्याला शिपाई घेऊन आले. साधु मोठे इचारात पडता पुढ काय व्हनार याची होयल धास्ती पडली. तिकड साधुबुवा सापडल्याची वरदी राजाला दिली गेली. राजानी थाटामाटात दरबार भरविण्याचा कारभाऱ्यांना हुकूम सोडला.

साधुला थाटामाटात मानपानात दरबारात मानाचे जागी बसवुन त्याला सुपभर सोन्याच्या मोहरा, शेला-पागोटा देन त्याची भरदरबारात वहावा करुन दरबारातील कायमचा मानकरी म्हणून त्याची नेमणूक केली.

राजा-रानीलं, सारे परजेला भारी आनंद झाला तसाच भारीबेस आनंद तुम्हा-आम्हांना होवो ही मनची गोठ!

रामराम दाजी!

❒ ❒ ❒

## संस्थावृत्त

फोन - ६१

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रुपये ६-००
टपाल खर्च अलग १ रुपया

# आदिवासी टाइम्स

महिन्याचे १ व १५ तारखेस प्रसिद्ध होणारे • सम्पादक :- मो. ग. लोटलीकर

वर्ष ४ अंक ११ वा) सोमवार दिनांक १५-११-७६ (किंमत २५ पैसे

पुणे विद्यापीठ

सोमवार दिनांक १/११/७६

मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ व पश्चिम विभाग केंद्र, भारतीय सामाजिक अनुसंधान परिषद, मुंबई यांच्यामार्फत आदिवासींच्या शैक्षणिक व इतर समस्या या विषयावर एक चर्चा-सत्र के. व्ही. हायस्कूल, जव्हार (जि. ठाणे) येथे ता ८, ९, १० नोव्हेंबर ७६ या दिवशी आयोजित केले आहे.

चर्चा-सत्राचे उद्‌घाटन पुणे विद्यापीठाचे कुलगुरु प्रिं. दे. अ. दाभोलकर यांच्या शुभ हस्ते होणार आहे. समारोप मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रिं. त्र्यं. कृ. टोपे यांच्या हस्ते करण्याचे योजिले आहे.

श्री. रा. वि. तेंडुलकर, नगराध्यक्ष, जव्हार हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. असे कार्यवाह श्री. रा. के. मुटाटकर कळवितात.

सोमवार ८/११/७६ सकाळी ९ ते ११ उद्‌घाटन प्रिं. दे. अ. दाभोलकर सकाळी ११.३० ते १ वक्ते - प्रा. गं. वा. सरदार प्रि. अनंतराव पाटील, प्रिं. छो. वा. देशमुख, श्रीमती अनुताई वाघ. दुपारी ३ ते ६ चर्चा.

मंगळवार ९-११-७६ सकाळी ९ ते ११ ११.१५ ते १ निबंध निवेदन व चर्चा अध्यक्ष - डॉ. आय. पी. देसाई, सुरत दुपारी ३ ते ६ चर्चा अध्यक्ष श्रीमती ताराबाई वर्तक

बुधवार ११/११/७६ सकाळी ९ ते ११ अध्यक्ष प्रिं. अनंतराव पाटील सकाळी ११ ते १ चर्चा दुपारी ३ ते ६ अभिप्राय व समारंभ प्रिं. त्र्यं. कृ. टोपे

संपादकीय

# महाराष्ट्र शासनाने या परिसंवादाची दखल घ्यावी

पुणे विद्यापीठाच्या विद्यमाने जव्हार येथे नुकताच आदिवासींची शैक्षणिक व आर्थिक समस्या या विषयावर एक परिसंवाद भरविण्यात आला होता. शिबिराला जोडून होणारा हा परिसंवाद भारतात प्रथमच झाला आहे. हा परिसंवाद पुणे-मुंबई येथे न घेता आदिवासी विभागातच घेण्यात पुणे विद्यापीठाने मोठे औचित्य दाखविले आहे. याबद्दल या परिसंवादासाठी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. दाभोलकर स्वत: उपस्थित राहिले, व त्यांनी परिसंवादाचे काम चांगले तऱ्हेने चालविले. एका मोठ्या विद्यापीठाचे कुलगुरु आमच्या आदिवासी विभागात येण्याची ही पहिली वेळ होय. इतर विद्यापीठा समोर प्रा. देवदत्त दाभोलकरांनी चांगला आदर्श ठेवून दिला आहे. अनेक आदिवासी प्रश्नात प्रा. दाभोलकरांनी रस घेतला व हे प्रश्न समजावून घेतले याबद्दल आम्हाला फार मोठे समाधान वाटते. आमच्या शिफारसी ते महाराष्ट्र शासनाला करतील व महाराष्ट्र शासन या शिफारशींची दखल घेईल अशी आशा आपण करू या.

शिबिराचे संचालक प्रा. रा. के. मुटाटकर ह्यांनी हा परिसंवाद शासनातर्फे भरत नसून विद्यापीठातर्फे भरत आहे, तेव्हा यात भाग घेणाऱ्या कार्यकर्त्यांनी मोकळेपणाने आपले विचार मांडावेत असे आवाहन केले. या आवाहनाचा योग्य तो परिणाम होऊन परिसंवादातील चर्चा मनमोकळी व वरच्या दर्जाची झाली व्यक्तीगत वा संस्थेवर किंवा शासनावर टीका न होता सर्व कार्यकर्त्यांनी प्रश्नांचे मूलगामी विवेचन केले व आदिवासींचे प्रश्न समजावून दिले. त्यामुळे या परिसंवादात उपयुक्त सूचना शिबिर संचालकांना करता आल्या हे चांगले काम झाले.

परिसंवाद यशस्वी होण्यासाठी जव्हारमधील कार्यकर्त्यांनी पुणे विद्यापीठाला संपूर्ण सहकार्य दिले, त्यामुळेच जव्हारची उंची वाढली आहे. प्रा. दाभोळकरांनी जव्हारबद्दल गौरवाचे उद्‌गार काढले आहेत. याचा अर्थ एवढाच की आदिवासी विकासासाठी या भागातील जनता व कार्यकर्ते शासनाला वाटेल ते सहकार्य करण्यास तयार आहेत. शास्त्रीय अधिकारी हे सहकार्य कसे स्वीकारता एवढेच आता पहायचे आहे.

❑ ❑ ❑

# पुणे विद्यापीठ-चालतवड येथे आदिवासी अभ्यास शिबिर

## पुणे व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु जव्हारच्या वाटेवर

अनेक पंचवार्षिक योजनांचे आराखडे झाले पण दुर्दैवाने नवीन आदिवासी माणूस निर्माण झाला नाही, तो निर्माण करावयाचा असेल तर आदिवासी माणसात विचाराचे परिवर्तन झाले पाहिजे. स्वत:च्या बुजरेपणा सोडून देऊन त्यांना धीट बनवले पाहिजे, असे विचार ठाणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा माई साहेब तथा ताराबाई वर्तक यांनी मोखाडा तालुक्यात चालतवड या आदिवासी खेड्यात दि. २९/१०/७६ रोजी काढले.

श्रीमती ताराबाई वर्तक ह्या पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या महाराष्ट्रातील कॉलेज प्राध्यापकांचे शिबिराचे उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जव्हारचे आमदार श्री. रामचंद्र भोये होते.

आपल्या भाषणात माईसाहेब पुढे म्हणाल्या की, ठाणे जिल्ह्यातील या आदिवासी भागात हे शिबीर भरत आहे ही महत्त्वपूर्ण घटना आहे. या आदिवासी भागात कोणी राहवयास तयार नसतो. मग तो बी. डी. ओ. असो, डॉक्टर असो, अगर कोणी अधिकारी असो. आता त्याला उपाय एकच आणि तो म्हणजे आदिवासी मधूनच असे अधिकारी निर्माण झाले पाहिजेत.

या तेरा दिवसांच्या शिबिराचे संचालकत्व प्रा. रा. के. मुटाटकर यांनी आयोजित केले असून भारतीय समाज विज्ञान परिषद व महाराष्ट्र शासन यांनी यासाठी अनुदान दिले आहे. या शिबिरात पदवीधर ४० विद्यार्थी असून परदेशातील थायलंडचाही विद्यार्थी आहे आणि यात ७ महिलांचाही समावेश आहे.

आदिवासींच्या शैक्षणिक व आर्थिक समस्या या विषयांवर या शिबिरात भर दिला जाणार असून हे विद्यार्थी प्रत्येक खेड्यातील घराघरांत जाऊन त्याचा अभ्यास करणार आहेत.

या शिबिराचा समारोप दि. १०/११/७६ रोजी जव्हार येथे होणार असून दि. ८/११ पासून एक चर्चासत्र आयोजित केले आहे. चर्चासत्राच्या पहिल्याच दिवशी पुणे विद्यापीठाचे कुलुगुरु श्री. दाभोलकर व समारोपप्रसंगी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु श्री. टोपे हजर राहणार आहेत.

या शिबिराचे उद्घाटन प्रसंगी आदिवासींच्या निरनिराळ्या प्रश्नांवर मोखाडाचे सभापती श्री. मुरलीधर भोईग, सदस्य वाघ गुरुजी, माजी सभापती सोनू कोंडू गोविंद, या आदिवासी पुढाऱ्याची भाषणे झाली. आदिवासींच्या शिक्षणाची समस्या त्यांच्या राहणीमानानुसार बदलली पाहिजे. असे कर्मवीर हायस्कूलचे प्रि. श्री. देशमुख यांनी यावेळी सांगितले प्रा. एम. बी. माणके यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास जव्हारचे नगराध्यक्ष श्री. रा. वि. तेंडुलकर सभापती किरकिरा, के. व्ही. हायस्कूलचे प्रि. श्री. अनंतराव पाटील व आदिवासी टाईम्सचे संपादक श्री. लोटलीकर हजर होते.

❐ ❐ ❐

## जव्हारच्या आदिवासी परिसंवादातील विचारमंथन

# शिक्षणाच्या साधनाने आदिवासींचे संपूर्ण जीवन परिवर्तन करा

महाराष्ट्रात जवळजवळ २५ लाख आदिवासी आहेत. त्यापैकी ७ लाखावर आदिवासी एकट्या ठाणे जिल्ह्यात आहेत. आदिवासी अत्यंत निकृष्ट अवस्थेत दिवस काढीत आहेत. त्यांना पोटभर अन्नही मिळत नाही. अनेक मार्गांनी त्यांची पिळवणूक होत आहे, याची जाणीव आता सर्वांनाच झाली आहे. स्वातंत्र्य मिळून आज २९ वर्षे झाली. आदिवासींवर बराच पैसाही खर्च झाला आहे. तरीही त्यांची स्थिती फारशी सुधारलेली नाही. आदिवासी कल्याणचे फार मोठे प्रयत्न या ठाणे जिल्ह्यात झाले आहेत. मुंबई राज्याचे भूतपूर्व मूख्यमंत्री कै. बाळासाहेब खेरे ह्यांनी या भागाचा दौरा करून आदिवासी कल्याणाच्या कार्यास चालना दिली. सुप्रसिध्द समाजसेवक आचार्य भिसे ह्यांनी ठाणे जिल्हा ही आपली कर्मभूमी मानली व समाज सेवेची सूत्रे त्यांनी हालविली. आदिवासींच्या शिक्षणाला त्यांनी प्रथम हात घातला व महाराष्ट्राची पहिली आश्रमशाळा तलवाडा येथे सुरु केली. त्यानंतर इतर आदिवासी भागात आश्रमशाळांचा प्रसार झाला. शैक्षणिक बाबतीत एवढा प्रयत्न होऊनसुद्धा आदिवासी समाज बराच मागासलेला आहे. त्यांचे अनेक प्रश्न अजून सुटावयाचे आहेत. याच पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठ व भारतीय सामाजिक अनुसंधान परिषद, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'आदिवासी शैक्षणिक व इतर समस्या' या विषयावर एक परिसंवाद गोखले शिक्षण संस्थेच्या के. व्ही. हायस्कूल, जव्हार या संस्थेत दि. ८, ९ व १० नोव्हेंबर रोजी भरविण्यात आला होता. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष श्री. बबनराव तेंडुलकर होते. परिसंवादाचे उद्‌घाटन श्रीमंत राजेसाहेब यशवंतराव ह्यांनी केले व परिसंवादाचे मार्गदर्शक प्रा. दाभोळकर म्हणाले, आदिवासींचे जीवन कसे असते याचा अनुभव आमच्या प्राध्यापकांना यावा यासाठी त्यांना येथे पाठविले आहे. या प्राध्यापकांना आतापर्यंत आले नाहीत असे वेगळे अनुभव त्यांना येथे आले असतील. सामाजिक न्याय, आर्थिक न्याय प्रस्थापित करावयाचा असेल तर सामाजिक दुर्बल व दलित वर्गापर्यंत तो न्याय पोचला पाहिजे.

आपण ज्यांना दरिद्री समाज म्हणतो, हा समाज किमान ५० टक्के तरी आहे. एवढा मोठा समाज आज दारिद्र्यात खिचपत पडला आहे. मग आपले कार्य फक्त ३०/४० टक्के लोकांसाठीच चालले आहे काय ? कुणास ठाऊक पण जाणते-अजाणतेपणे असे वाटू लागले आहे. या परिस्थितीत आपणांस बाहेर पडावयाचे आहे. म. गांधी एकदा म्हणाले होते की, भंग्याची मुलगी या देशाची राष्ट्राध्यक्ष होईल असा भारत निर्माण झाला पाहिजे. कनिष्ठ वर्गातील एकादी

भगिनी सर्वोच्च स्थानापर्यंत पोचली पाहिजे अशी शक्यता निर्माण झाली पाहिजे असे गांधीजीचे भारताचे स्वप्न होते.

भारतातील दारिद्र्याची स्थिती अशी आहे की, आपण जे पाहतो तेवढेच दारिद्र्य असे आपण समजतो, पण हे खरे नाही. जेवढे आपण दुर्गम भागात जाऊ तेवढे अधिक दारिद्र्य आपणाला दिसते. या लोकांपर्यंत हा अत्यंत कठीण प्रश्न आहे. तरीसुद्धा आपणास हा प्रश्न सोडविलाच पाहिजे.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणाच्या साधनाने आपणास आदिवासींचे संपूर्ण परिवर्तन करावयाचे आहे. संस्थांतून मिळणारे व बाहेरून मिळणारे शिक्षण असे शिक्षणाचे अनेक पर्याय आहेत. यातील कोणता पर्याय कधी घ्यायचा हे आपणास ठरवावे लागेल. अजूनही बहुसंख्य जनता निरक्षर आहे. त्यात कितीतरी गट आहेत. सर्व गटासमोर असणारे प्रश्न वेगळे आहेत. सध्या आपण सलग शिक्षण देतो. आदिवासींना असे सलग शिक्षण घेता येत नाही. शाळेतून बाहेर पडला म्हणजे शिक्षण संपले असे समजण्याचे कारण नाही. त्याचे शिक्षण चालूच राहिले पाहिजे.

**शिक्षणातून समर्थ जाणीवा निर्माण करा**

महाराष्ट्रातील सुप्रसिध्द विचारवंत प्रा. गं. बा. सरदार आपल्या भाषणात म्हणाले, चाळीस पंचेचाळीस वर्षापूर्वी माझ्या वडिलांनी आदिवासी सुधारणेसाठी पहिले वसतीगृह स्वतःच्याच खर्चाने देहेरे गावी सुरु केले. हेच संस्कार मी घेऊन गेलो आहे. जव्हारला असताना स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्या देशभक्तीच्या कथा ऐकल्या व दुसऱ्या बाजूला आदिवासींचे भयानक जीवन मी प्रत्यक्ष येथे पाहिले.

पुणे विद्यापीठाचे प्राध्यापक येथे काम करतात. ही दृष्टी महत्त्वाची आहे. बुद्धिमंतानी उदासीन न राहता वास्तवता काय आहे हे शासनाला समजावून सांगितले पाहिजे. मिशनऱ्यांनी खेड्यात समरस होऊन काम केले. जी दृष्टी आम्ही द्यायची ती दृष्टी आम्हाला मिशनऱ्यांनी दिली.

आदिवासी समाज हा नवीन पध्दतीने बांधावा लागेल, त्यांचे दारिद्र्य संपविणे हे एकच उद्दिष्ट नाही तर त्याचा संपूर्ण विकास झाला पाहिजे. आपणास मोठा पल्ला गाठावयाचा आहे. त्या कामाची निश्चित कल्पना आपणास असली पाहिजे. ही कल्पना नसेल तर वैफल्य येईल. ते येऊ नये यासाठी आपली भूमिका नवसमाज निर्मितीच्या दृष्टीने निश्चित असली पाहिजे. म्हणून शिक्षकांचे प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. या योजनेच्या लोकांना वस्तुनिष्ठ दृष्टिकोन आपण दिला तर उत्तम कार्य होऊ शकेल. डोळ्यांमध्ये दृष्टी येणे हे महत्त्वाचे आहे. संकुचित अर्थाने शिक्षणाचा विचार होता कामा नये. शिक्षणातून नवा माणूस निर्माण झाला पाहिजे. शिक्षणातून समर्थ जाणीवा निर्माण झाल्या पाहिजेत. कार्याचे क्षेत्र मर्यादित असले तरी चालेल. किंबहुना ते तसे मर्यादितच राहणार आहे. कारण माणसाची शक्तीही मर्यादित आहे.

आदिवासींमध्ये समर्थ नेतृत्व निर्माण झाले पाहिजे. दलितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे समर्थ नेतृत्व मिळाले होते. तशा स्वरुपाचे नेतृत्व आदिवासी समाजाला लाभले पाहिजे. मात्र हे नेतृत्व त्या समाजापासून दुरावता कामा नये. साधारणपणे ते दुरावते असा कटू अनुभव आहे. पुढे गेलेले हे नेतृत्व

व त्यांचे लोक यात दरी निर्माण होते. म्हणून हे टाळले पाहिजे. समाजाच्या दलितपणाचे भांडवल करून एकेक व्यक्तीचा किंवा गटांचा फायदा करणारे नको. तर सबंध समाजाचा विकास साधणारे नेतृत्व निर्माण झाले पाहिजे असे नेतृत्व देणारे लोक थोडेच असतात. व तेच खरे समाजाचे नेते असतात. आपल्या आदिवासी समाजाच्या विकासासाठी सर्व समाजातून मोठ्या प्रमाणावर पैसा मिळतो. तेव्हा सर्व समाजाचे ऋण आपल्यावर आहे हे या नेतृत्वाने विसरू नये. हा प्रश्न जसा आपल्या परिवर्तनाचा आहे. तसाच आदिवासी समाजाच्या परिवर्तनाचाही आहे.

आदिवासींना धीर धरा असे कोणी सांगू नये. कारण त्यांनी अनेक वर्षे धीर धरलेला आहे आता धीर धरणे शक्य नाही. त्यांच्या विकासाला गती दिलीच पाहिजे.

आदिवासींना पुस्तकी शिक्षण नको असाही प्रचार नको. कारण तुम्हाला ते खूप मिळाले आहे. आदिवासींना ते अजिबात मिळालेले नाही. पुस्तकी शिक्षणात आवश्यक ती सुधारणा जरुर करा.

आदिवासींची मूळची भाषा राखली पाहिजे. कोणतीही बोलीभाषा घेतली तरी तिचे काही संकेत असतात, म्हणून त्या भाषेला अशुध्द म्हणणे बरोबर नाही. त्या भाषेतही परिणामकारक शब्द असतात आणि त्यांचा योग्य वापर झाल्यास त्यामुळे प्रमाण भाषा समृध्द होऊ शकते.

**प्रा. अनंत पाटील**

❑ ❑ ❑

# जव्हार येथील हरिजनवाड्यास कुलगुरु श्री. दाभोळकर यांची आपुलकीची भेट

पुणे विद्यापीठाचे कुलगुरु प्रि. देवदत्त दाभोलकर यांनी सपत्नीक येथील करकरेगुरुजी पथावरील मुकणे कॉलनीतील हरिजनवाड्यास दि. ७ रोजी भेट दिली. त्यांचे समवेत प्रा. गं. बा. सरदार व डॉ. सुधीर फडके, नाशिक तसेच आदि. महा. चे श्री. बोधनकर हजर होते.

जव्हारचा हरिजनवाडा पाहताक्षणीच प्रिं. दाभोलकर म्हणाले साऱ्या महाराष्ट्रात मी अनेक ठिकाणचे हरिजनवाडे पाहिले, पण जव्हारचा हरिजनवाडा हा महाराष्ट्रात एकच एक असा आदर्श दिसला. तो नुसताच स्वच्छतेमुळे आदर्श नसून या समाजातील तरुणवर्ग स्वत:च्या पायावर उभा राहून मोठमोठ्या हुद्यावर आज काम करीत आहे हे ऐकून तर मला समाधानच वाटले.

प्रा. सरदार यांचेही ह्यावेळी उचित असे भाषण झाले. ॲड. श्री. रामराव मुकणे यांनी ह्या प्रसंगी सर्वांची ओळख करून दिली श्री. बाबुराव मुकणे यांनी आठवणींना उजळा दिला. पत्रकार श्री. दयानंद मुकणे ह्यांनी आभार मानले.

❑ ❑ ❑

## जव्हार येथील आदिवासींवरील परिसंवादातील विचारमंथन

# आदिवासींची शैक्षणिक व आर्थिक समस्या

प्रा. अनंत पाटील

पुणे विद्यापीठाच्या विद्यमाने महाराष्ट्रातील कॉलेज प्राध्यापकांचे एक शिबीर (वर्कशॉप) चालतवड, ता. मोखाडा येथे भरले होते. या शिबिरात आदिवासींची शैक्षणिक व आर्थिक पाहाणी करण्यात आली. नंतर त्याच विषयावर एक परिसंवाद गोखले शिक्षण संस्थेच्या के. व्ही. हायस्कूल जव्हार येथे नुकतेच घेण्यात आला होता. या परिसंवादासाठी महाराष्ट्रातील आदिवासी विभागातून अनेक कार्यकर्ते आले होते. परिसंवाद तीन दिवस चालला होता. पहिल्या दिवशी पुणे विद्यापीठाचं कुलगुरु प्रा. देवदत्त दाभोलकर ह्यानी परिसंवादाचे संचलन केले. भारतातील एक ज्येष्ठ समाज शास्त्रज्ञ व सेंटर फॉर रिजनल डेव्हलपमेंट, सुरतचे डायरेक्टर डॉ. आय. पी. देसाई हे दोन दिवस चर्चा सत्राचे अध्यक्ष होते.

परिसंवादामध्ये भाग घेताना प्रसिध्द विचारवंत प्रा. गं. बा. सरदार म्हणाले. आदिवासींमध्ये नैराश्य दिसत नाही. कारण ते परिस्थितीला शरण जातात. जे प्रगतीची वाटचाल करीत नाहीत व जे खालच्या पातळीवर आहेत त्यांना नैराश्य येत नाही. माणूस वरच्या पातळीवर आला की द्वंद्व निर्माण होते व नैराश्य येते. आदिवासींना नैराश्य नाही म्हणून त्यांचे जीवन चांगले असे म्हणता येणार नाही. नैराश्य येणे हे चांगले, कारण ते प्रगतीचे निदर्शक आहे.

आदिवासींचा दैवी शक्तीवर विश्वास आहे, त्याला काय दोष देणार ? शिकलेला माणूसही ज्ञानाची हद्द संपली की चमत्कार येतो. आदिवासी डॉक्टराकडे न जाता जखमेला पाला बांधतो येथे अनुभवाचा जोर असतो. असा मानवी समाज नाही की जो पूर्णपणे मानवी प्रयत्नावर अवलंबून आहे की चमत्कारावर अवलंबून आहे. मुंबईसारख्या शहरात मानवी प्रयत्नात अपयश आले की साईबाबाचा अंगारा येतोच. जो जो शिक्षण मिळाले तशी परिस्थिती सुधारेल व खेड्यातील भगत कमी होईल, आणि तो औषधाकडे जाईल. शहरात हे होते, कारण सोयही पुष्कळ आहेत. अनुभव जसा संपन्न होईल व विज्ञान जसे वाढत जाईल त्याप्रमाणे माणूस औषध घेईल. साधारणपणे बहुतेकांमध्ये दुबळेपणा असतो. प्रगत देशामध्येही हा आविष्कार आहे. कोकणात भूते आहेत. पण कोकणातील माणसे मुंबईत असूनही भुते नाहीत. डोळसपणा व ज्ञाननिष्ठा यामधूनच ही अंधश्रध्दा जाईल.

डॉ. सुधीर फडके म्हणाले "एका खेड्यातील आदिवासींनी माझी परीक्षा पहायचे ठरविले. देवीच्या तीन केसीय मी घेतल्या, व तीन भगताकडे दिल्या. माझ्या सर्व केसीस जगल्या व भगताचे तीनही रुग्ण मरण पावले. नंतर मात्र सर्व खेडूत माझेच उपचार घेऊ लागले, अनुभवाने आदिवासी औषध घेऊ लागतो हा माझा अनुभव आहे."

दलितमित्र श्री. ह. दा. राऊतगुरुजी म्हणाले. "आजचे शिक्षण कुचकामी आहे अशी हाकाटी होते हे बरोबर नाही. कोणतेही शिक्षण कुचकामी नसते. त्यात योग्य तो बदल करा. आदिवासी भाषा मराठीला अगदी जवळची आहे. म्हणून पुस्तके मराठी भाषेतच असावीत. आदिवासी समाजाची अनेक वर्षे उपेक्षा झाली, म्हणून त्यांच्यात नैराश्य आले आहे. आश्रमशाळेमधील दोष काढले तरी आश्रमशाळेसारखा पर्याय नाही."

विकासवाडीच्या श्रीमती अनुताई वाघ म्हणाल्या ''पाचवीपर्यंतचा विद्यार्थी आदिवासीसारखा असतो व नंतर फरक लक्षात येतो आदिवासी विभागात काम करणाऱ्या शिक्षकांना आदिवासींच्या भाषेचे ज्ञान असले पाहिजे. 'नांग' म्हणजे पाहणे. नांग या शब्दाऐवजी माझे विद्यार्थी बघ शब्द वापरू लागले. त्यांना नांग शब्द मागासलेला वाटू लागला. आम्ही नांग शब्द वापरला की ते हसू लागतात.''

जव्हार पंचायत समितीचे सभापती श्री. किरकिरा म्हणाले, ''आमचा आदिवासी विद्यार्थी सहावी-सातवीपर्यंत दिसतो व त्याचे शिक्षण थांबते. प्रा. अनंतराव पाटील येथे आले आहेत व परिस्थितीत सुधारणा झाली आहे. शिक्षणासाठी खूप पैसा खर्च होतो. पण कारणी लागत नाही. बालवाड्यांची संख्या वाढविली तरच आदिवासी मुलांवर चांगले संस्कार होतील. संस्कार करणाऱ्या शिक्षकाची आज आदिवासी विभागाला आवश्यकता आहे. शिक्षक आदिवासीच पाहिजेत असा आमचा आग्रह नाही.''

आमदार श्री. रामचंद्र भोये म्हणाले. ''सरकारला सर्व कार्यासाठी पैसा खर्च करणे शक्य होत नाही. पण त्यातूनही काही पर्याय काढता येईल. एका योजनेसाठी असलेला पैसा दुसऱ्या योजनेसाठी टाकता येईल.

प्रा. अनंतराव पाटील म्हणाले ''या परिसंवादात पूर्व प्राथमिक शाळा, एकशिक्षकी शाळा व प्राथमिक शाळा या प्रश्नांची फार चर्चा झाली आहे. प्राथमिक विद्यालयातही आदिवासींची संख्या मोठी आहे. त्यांचे व आदिवासी विभागातील माध्यमिक शाळांचे काही प्रश्न मी मांडतो. माझ्या मते आदिवासी विद्यार्थी बुध्दीने कमी नाही. माझे काही आदिवासी विद्यार्थी पदवीधरही झाले आहेत. मात्र त्यांना सातत्याने शिक्षणाचे महत्व पटवून देऊन त्यांच्यासाठी मेहनत घेतली पाहिजे. प्राथमिक शाळेतून इयत्ता सातवी पास होऊन विद्यार्थी आठवीला येतात तेव्हा त्यांचे इंग्लिश, गणित हे विषय बरेच कच्चे असतात. विशेषत: विषय कच्चा असल्यामुळे त्यांच्यासाठी माध्य. शिक्षण मंडळाने कंडेन्स्ड कोर्स ठेवलेला आहे. जोपर्यंत पाचवी इयत्ता हायस्कूलला संपूर्णपणे जोडल्या जात नाहीत तोपर्यंत कंडेन्स्ड कोर्स चालूच ठेवावा. तो सन १९७७ पासून बंद करण्याचा शिक्षण मंडळाचा निर्णय बरोबर नाही. या निर्णयाचा फेरविचार व्हावा.

महाराष्ट्र शासनाला आदिवासी विभागातील शिक्षणाच्या अडचणी सांगून त्या शासनातर्फे सोडवून घेण्याचा प्रयत्न झाला तरच हा शिक्षणाचा प्रश्न सुटेल. जो खर्च या कार्यासाठी होईल ते डोळसपणे व्हावा.''

परिसंवाद समारोप करताना खासदार श्री. दुमाडा म्हणाले ''आमच्या आदिवासी मुलांना चांगले संस्कार होण्यासाठी बालवाड्यांची संख्या वाढवावी व त्यांच्यावर पांढरपेशी शिक्षिका असावी. आजच्या शाळांना बालवाड्यांचे स्वरुप द्यावे व आश्रमशाळा काढाव्यात.

**खेड्यातील पाहाणी - ठळक विशेष**

पुणे विद्यापीठाने पाहणीसाठी मोखाडा तालुक्यातील पाच खेडी निवडली होती. त्यात खालील ठळक गोष्टी त्यांच्या नजरेस आल्या -

१) घरात प्रकाश नाही, हवा खेळती राहण्याची व्यवस्था नाही.

२) घरात अंधार व चुलीचा धूर, त्यामुळे डोळ्यावर परिणाम होण्याची व छातीचे रोग होण्याची शक्यता.

३) प्रत्येक घरामध्ये गोठा होता. हे आरोग्याच्या दृष्टीने घातक आहे.

४) सर्वच माणसे मद्यपान करतात, दारुसाठी गूळ व नवसागर यांचा वापर करतात.

५) अपुरा आहार सर्वांना मिळतो. त्यामुळे शारीरिक वाढ खुंटते.

६) या लोकांना समतोल आहार माहीत नाही, अन्नातील सर्व घटक त्यांच्या आहारात नसतात.

७) निरोगी माणूस कोण हे या लोकांना माहीत नाही.

८) पिण्याचे पाणी स्वच्छ नसते, साधारणपणे ओहोळाचे असते.

९) त्यांचे कपडे स्वच्छ नसतात.

१०) रोग बंद करण्यासाठी भगताकडे जातात, डॉक्टरकडे जात नाहीत.

११) बाळंतपण घरीच होते.

१२) जन्म मृत्यूच्या नोंदी आढळत नाहीत.

**अभिप्राय व सूचना -**

शिबीरप्रमुख प्रा. रा. के. मुटाटकर म्हणाले "या शासकीय शिफारसी नाहीत, मात्र या शिफारसींचा नियोजन व अंमलबजावणीसाठी उपयोग होईल. आम्ही या भागातील आदिवासींचा विश्वास संपादन केला आहे, त्यामुळे आम्हाला या भागात काम करणे सोपे गेले."

१) शिक्षणाची गोडी लागावी यासाठी गाव तेथे बालवाडी असावी.

२) तीन चार खेड्यांमध्ये केंद्रभूत शाळा असाव्या.

३) नाले-ओहोळावर लहान पूल असावेत.

४) शाळेत दुपारचे जेवण देण्याची व्यवस्था व्हावी.

५) तीन चार शाळा मिळून शिक्षक निवासाची व्यवस्था व्हावी.

६) एकशिक्षकी शाळा अपयशी ठरल्या आहेत. एक शिक्षक एकवर्ग हे सूत्र असावे.

७) पाट्या-पुस्तके सत्राच्या आरंभी दिली जावोत.

८) शाळेचे रेकॉर्ड पूर्ण असावे.

९) एकंदर सुपरविजन तोकडे आहे, भौगोलिक रचना पाहता वयस्कर शिक्षकांना पायपीट जमत नाही, तरुण सुपरवायझरची नेमणूक प्रत्यक्ष (डाररेक्ट) असावी व सुरपवायझरची संख्या वाढवावी.

१०) पूर्व सूचना न देता अधिकाऱ्यांनी कोणत्याही वर्गाची चाचणी घ्यावी. चांगल्या शाळांना पारितोषिके देण्यात यावीत.

११) ज्या गावातील सर्व मुले शाळेत जातात त्या गावांना पारितोषिक द्यावीत.

१२) आदिवासींना वेगळे शिक्षण देण्याची गरज नाही.

१३) शिक्षणाचे माध्यम मराठी असावे, शिक्षकांना आदिवासी बोलीचे ज्ञान असावे.

१४) पालक व विद्यार्थ्यांच्या सहली आयोजित करण्यात याव्यात.

१५) आश्रमशाळा केवळ बोर्डींग स्कूल नसून विकासाचे केंद्र बिंदू असावी.

१६) आश्रमशाळेत अनुभवी शिक्षकांना प्राधान्य द्यावे.

१७) आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी एक समिती असावी.

१८) शिक्षकांना इंग्रजी, गणित, विज्ञान विषयाच्या प्रशिक्षणाची सोय असावी.

१९) आदिवासी-बिगर आदिवासी असा शिक्षकांत भेद असू नये.

२०) शिक्षकांना शिक्षणाऐवजी दुसरे काम देऊ नये.

२१) पालकांना शिक्षणाचे मूल्य कळलेले आहे.

२२) पालकांना आर्थिक मदत देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

२३) मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था शोचनीय आहे.

२४) आदिवासींना इतरांच्या बरोबर शिक्षण प्राप्त व्हावे.

२५) आदिवासींना औद्योगिक शिक्षणाची सोय व्हावी.

२६) पालक पुढारी ह्यांना राष्ट्रीय प्रवाहात मिसळण्याची तीव्र इच्छा

२७) शिक्षक गैरहजर रहातो म्हणून शाळा चालत नाही हे संपूर्ण सत्य नाही, आर्थिक परिस्थितीही त्यास जबाबदार आहे.

(पृष्ठ २० वरुन पुढे)

केस अंबाडीचे सोडलेले

लहान मुलांना भीतीदायक सोंग

टीप:- मी प्रत्यक्ष बोहड्यात नाचणाऱ्या पाहिलेल्या

व्यक्ती

भटजीचे सोंग नाचवावे - कै. सदु कासार जव्हार

मारुती - कै. सदू - गंगाभाऊ घोलप

सटवाई - श्री. गंगाभाऊ पहाडी

चारण - कै. श्रीधर पहाडी

रावण - कै. गणपतशेट पहाडी

खंडेराव (जव्हार बोहाडा) - कै. छबीलदास नगरशेट व जगजीवनदास

खंडेराव ग्रामीण भाग - श्री. पांडु पाटील (भरसटमेट)

देवी - डिंगोरे शेट शिंपी (घराणे)

भीम - विश्वनाथ गोडबोले

बकासुर - कै. भाऊशेट पहाडी

एकादशी - गणपतशेट तांबोळी जव्हार

सरस्वती - श्री गौरी शंकर जोशी

हिंडिंबा - कै. धोंडू पहाडी व कै. बाबाजी नवले

वेताळ - कै. राघो शिंदे

राक्षस - श्री. नाथा कदम

बोहाड्यात संभाषण (संपादणी) कै. दशपुत्र शास्त्री, धोडुंशेट लासे, भाऊशेट पहाडी, नवले, गंगाराम बोरसे.

गणपतशेट पहाडी, गोडबोले, धोंडुतेली, सरकारी उत्सव (बोहडा)


सर्व खासकट आळी वारली क. व प्रमुख घोडके कंपनी हुजरे इ. व गावकरी जव्हार कर.

या उत्सवाबद्दल अनेक लहान सहान बाबी न घेता बऱ्याच दिवसांनी मला वाटत असलेल्या या बोहोड्यांची टीका न करता कलाकारांचा आदर व मान ठेवून वर्णनपर संकलनात्मक माहिती अनुभवलेली प्रत्यक्ष पाहिलेला भाग उद्‌धृत करुन वाचक वर्गाला सादर करावा अशी बऱ्याच दिवसांची इच्छा माझ्या वयाच्या ९५ व्या वर्षांत पदार्पण केल्यानंतर पुरी करण्याची उमेद माझ्या कुल-स्वामीनी अंबामातेच्या कृपेने मला लाभली, हे मी माझे भाग्य समजून महाराष्ट्राच्या मायभवानीला दिनांक २० मे २००४ च्या पहाटेला जागरण करुन ठीक ४-०० वाजता ही वाक् सुमनांची माला आदरपूर्वक अर्पण करीत आहे.

"अंबामातेकी जय"

भले ग आंबाबाईऽऽ बाईचा भगत कोणे ठायी गऽ ठायी, ठायी, ठायी !!!

❒ ❒ ❒



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ

## २००७ – २०१०

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष व संस्थापक | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : | डॉ. हेमंत आपटे |
| कोषाध्यक्ष | : | ग. शां. पंडित |
| सचिव | : | डॉ. अभय कुदळे |
| सहसचिव | : | सञ्जु जोसेफ |
| सदस्य | : | डॉ. रजनीकांत आरोळे |
| | | डॉ. चंद्रकांत पांडव |
| | | डॉ. सुभाष वाळींबे |
| | | डॉ. राम गंभीर |
| | | जयवंत मंत्री |
| | | डॉ. बाबुल पठाण |
| | | डॉ. कल्पना मुटाटकर |
| | | श्री. विदुला पुरोहित |

१९८० - १. जबरन जोत जंगल जमीन
२. आदिवासी व शिक्षण
३. आदिवासी वनसंवर्धन
४. आदिवासी साहित्य व कला

१९८१ - १. दलितांना सवलती व राखीव जागा
२. आदिवासी व आरोग्य
३. वनशेती व संवर्धन
४. रोजगार हमी योजना

१९८२ - १. धरणे व विकास
२. धरणे व विकास
३-४. जंगल व्यवस्थापन

१९८३ - १. आदिवासी व दारु
२. आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
३. प्रा. सरदार गौरव अंक
४. आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न

१९८४ - १-२ आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
३. आदिवासी स्त्री
४. आदिवासी आरोग्य व शिक्षण

१९८५ - १. आदिवासी संघटन
२. जमीन हस्तांतर
३. आदिवासी महिला
४. आदिवासी व सरकार

१९८६ - १. जंगल व धरण
२. आदिवासी कला
३. आदिवासी व वेठबिगारी
४. आदिवासी विषयक ग्रंथ : मानवशास्त्र परिचय

१९८७ - १. भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
२. आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३-४. राष्ट्रीय वननितीचा प्रश्न

१९८८ - १. सवलती अपहरणाची समस्या
२. आदिवासी साहित्य
३.-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९८९ - १-२. डॉ. वेरिअर एल्विन विशेषांक
३-४. व्यवसाय मार्गदर्शन

१९९० - १-२. १महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
३. जागतिक अदिवासी
४. गं. बा. सरदार स्मृति विशेषांक

१९९१ - १. आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
२. आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
३. आदिवासी जीवन व संस्कृती

१९९२ - १-२. आदिवासी समाज जीवन
३-४. अनुताई वाघ विशेषांक

१९९३ - १-२. आदिवासी धर्म, सण व उत्सव
३-४. धरण - विस्थापन व पुनर्वसन

१९९४ - १. आदिवासी संस्कृती
२. आदिवासी एकता परिषद
३. आदिवासी विकासाची सैध्दांतिक भुमिका
४. आदिवासी जमाती

१९९५ - १-२. राणीपूर अभ्यास विशेषांक
३. कुपोषण विशेषांक
४. पर्यावरण विशेषांक

१९९६ - १. आदिवासी जमाती
२. महाराष्ट्र, ओरिसा अदिवासी अध्ययन
३. आदिवासी जमाती
४. आदिवासी शिक्षण

१९९७ - १-२. वारली लोकगिते व बोलीभाषा
३. पंचायत राज विशेषांक
४. साहित्य संमेलन विशेषांक

१९९८ - १. वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
२. आदिवासी व प्रशासन
३-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९९९ - १. आदिवासी व आर्थिक धोरण
२. आदिवासी विकास व संस्कृती
३-४. बोर्डी परिसर अभ्यास

२००० - १. आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
२. स्त्रिया आणि आरोग्य
३. पाणी टंचाई आणि पाणलोट विकास
४. आदिवासी जीवन व संस्कृती

२००१ - १-२. अस्मिता व विकास विशेषांक
३. आदिवासी समाज व शासन
४. अस्मिता व विकास : दिशा २००१

२००२ - १. अदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास
२-३. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : महाराष्ट्र
४. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : पर्यायी उपाययोजना

२००३ - १-२. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : मध्यप्रदेश
३. आदिवासी समाज
४. आदिवासी संस्कृती

२००४ - १. पुस्तक परिचय
३-४. आदिवासी विकास धोरण

२००५ - १. प्रस्तावित वनकायदा
२. डॉ. बानू कोयाजी स्मृती विशेषांक
३-४. आरोग्य व शिक्षण - नंदूरबार अभ्यास विशेषांक

२००६ - १-२. डॉ. इरावती कर्वे स्मृति विशेषांक
३-४. आदिवासी अस्मिता व साहित्य कला

२००७ - १-२ संस्कृती व समाज - आदिवासी पायाभूत सर्वेक्षण विशेषांक
३-४ आरोग्य- आदिवासी पायाभूत सर्वेक्षण विशेषांक

Registered with the Registrar of Newspaper of India under No. 35835/80



'जव्हार' च्या आदिवासी राजाचा राजवाडा